# देवापुढचा दिवा

सदानन्द रेगे

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र.
REFBK-0014830
REFBK-0014830

१९५०२
८३४३
११।३।७१

१९८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ८४३४३ वि: काव्य
क्रमांक १९८८ नोंद दि ११।३।७१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धि योजना
१९७०

# देवापुढचा दिवा

98630

सदानन्द रेगे

REFBK-0014830
REFBK-0014830

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© सदानन्द रेगे

पहिली आवृत्ती ऑगस्ट १९६५
भाद्रपद १८८७

मुद्रक : वि० पु० भागवत
मौज प्रिंटींग ब्यूरो
खटाववाडी
मुंबई ४ BR

प्रकाशक : ग० रा० भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ३४ WB

शरद् मंत्री यास—

*हे जग सोडून जाताना*
*बरोबर न्याव्याश्या वाटतील*
*अशा गोष्टींत*
*तुझ्या स्नेहाच्या आठवणी*
*असतीलच असतील...*

# अनुक्रम


| | |
|---|---|
| जटायु | ३ |
| भीक | ४ |
| रात्रीं भटकणारा वेडा | ५ |
| इकारस | ७ |
| हुतात्मा | ९ |
| पावसांत भिजलेले घोडे | ११ |
| अवकाशाचा कसा छान लागला आहे तंबोरा | १२ |
| लिटल् मर्मेड | १३ |
| दडपण | १४ |
| वर आहे आकाश | १५ |
| आत्महत्या | १६ |
| सकाळपासून | १७ |
| मला भीति वाटते रंगांची | १८ |
| ऑटम् | १९ |
| नक्षत्रांच्या बागेतून | २० |
| आरशांतल्या माणसाचा हितोपदेश | २२ |
| कावळा | २३ |
| स्टेशन | २४ |
| दगड | २५ |
| निरर्थालाहि अर्थ येऊं पहात होता | २६ |
| पुलावरच्या मुली | २७ |
| नागासाकी | २८ |
| डोळ्यांवर अशी झोप आहे | २९ |
| चार रंगवेडे | ३० |

| | |
|---|---|
| बेटोवन | ३१ |
| शब्द | ३२ |
| न्यायाधीश | ३४ |
| मोकळा | ३५ |
| नेपोलीयन बोनॅपॅट् | ३६ |
| एक होता एक : एक आपलं असंच बालगीत | ३८ |
| एक गाणें | ४० |
| देवापुढचा दिवा | ४१ |
| ऑफेलिया : १ | ४२ |
| ऑफेलिया : २ | ४३ |
| प्रेषित | ४४ |
| शंख | ४५ |
| वडील देवपूजेला बसतात | ४६ |
| निरो | ४८ |
| भंकस | ४९ |
| रान | ५१ |
| उन्हाशीं बसलेला महारोगी | ५२ |
| सगळेच आई-बाप | ५३ |
| थुंक्तो तुझ्या करुणेवर | ५५ |
| कॅलिबन् | ५७ |
| बुबुळं मालवल्यावर मग | ५८ |
| आठवण | ५९ |
| बांग | ६० |
| चित्र | ६१ |

| | |
|---|---|
| इडिपस | ६२ |
| एक पोरकट आठवण | ६३ |
| क्लिओपात्रा | ६४ |
| म्हणून सांगतों | ६५ |
| प्रसूतिगृहांत वाट पहाणारा कुणी | ६७ |
| सौदा | ६९ |
| मुंबईतील वसंत | ७१ |
| विषनृत्य | ७२ |
| गारुड-डोळा | ७३ |
| मरतांना उघडे राहिलेले डोळे | ७४ |
| अटळ | ७७ |
| मृत्यु : कांहीं कविता | ८२-१२१ |
| बॉदलेअर : अनुवादित कविता | |
| मरण प्रेमिकांचें | १२४ |
| मरण गरीबाचें | १२५ |
| अखेर दिवसाची | १२६ |

"***Whoever** does not affirm at some time or other with a **definite** resolve — yes, jubilate at — the terribleness **of life,** never takes possession of the unutterable **powers of** our existence ; he merely walks at the edge **and when** the decision is made eventually he will have **been neither** one of the living nor one of the dead.*"

RAINER MARIA RILKE

## जटायु

सूर्याच्या कमंडलूंतील कृष्णघोर वादळ
कोसळतें तोडीत आकाशाचा लचका
अन् शाश्वताचा होतांना तुला चांफेगौर साक्षात्कार
तडफडतें तुझ्या पंखांचें तुटकें वेदनायन
दशाननाच्या अंगठींतल्या खड्यांत
अश्वत्थाम्यासारखें...

लिलेहामेर
१·९·६१

संग्रहालय ठाणे
दा. क.
(स्थळ प्रत)

# भीक

आहे-नाहींच्या गाभाऱ्यांतील
मातीच्या पिंडीवर
सांडली आहे
मार्कंडेयाची निमूट दीड चिमूट राख
अन् पिंडीच्या पुढ्यांतील आंडील नंदी
बसला आहे चघळींत
विश्वरहस्याचा पोकळ कडबा...
उपाशी नचिकेताचें
पडलेलें कोंवळें प्रेत यमाच्या पायरीवर
कां–कुठें–कसें–केव्हांचें
कफन पांघरून...
अन् ॐकारेश्वराच्या वाटेवर
वाट पहात बसलेला कुणी चिरंजीव
मागतो आहे मरणभीक्षा
प्रेषिताच्या कवटीमधून...

१·९·६१

## रात्रीं भटकणारा वेडा

माझ्या घशांत वाळवंट आग खात बसतं!
मी चंद्राचा एक घोट घेऊं का?
माझ्या डोळ्यांतली ही विटाळशी रात्र
तिनें सूर्याचा सुर्मा असा पुसला कां?

हे रस्त्यावरचे दिवे केव्हांचे वाचत काय बसलेत?
अजून त्यांची परीक्षा संपली कीं नाहीं?
वाटोळं वाटोळं वेटोळतं आहे कुत्रं
त्याची बायको त्याला सांपडत कशी नाहीं?

माझा चेहरा...एल्सिनोरचा किल्ला
तरीच हें भूत इथं घालतंय् फेऱ्या!
लोक म्हणतात : हॅम्लेट तर चक्क झालाय् वेडा
पण ऑफिलिया कां अशी चघळतेय् कैऱ्या?

माझ्या मनांत आहे उलटं झाड उगवलं
त्याच्यावर झोंपाळा बांधायलाच हवा का?
टांगून घेतलं जर मी याच्या बुंध्याला
तर आकाशाला पाय लागणारच नाहींत का?

तर्कशास्त्राचा प्रोफेसर मेला म्हणे दुपारीं
व्याकरणाचें हाडूक गळ्याला अडकून!
पण मध्येंच त्याचें प्रेत उठून कां बसतें?
बांधा कीं कार्याला कारण करकचून!

माझा मेंदू काल मला दिसला
भंडारी हॉटेलांत तव्यावर बसलेला
म्हटलं आणा चांगला मीटमसाला लावून
तर म्हणे भेज्ज्या खल्लास झाला ऽऽऽ

लिलेहामेर
२१·१०·६१

## इकारस

*"Mama, Papa is wounded"*

ओल्या जखमेचं भळभळ ओझं
लादून घेऊन स्वतःच्याच पाठीवर
चालला आहे बापडा नियतीचा डोंबारखेळ खेळत
प्राक्तनाच्या भणभण टेकाडावर.

याच्या वेदनांच्या अक्षय आरशांत न्याहाळीत
भोगते आहे उर्वशी स्वरूपाचा साक्षात्कार;
अन् तुळशीच्या द्रोणांत गंगाजळ घेऊन आलेले मित्र
करताहेत चीत्कार...करताहेत घूत्कार.

या वेड्या जखमेनंच ओतली होती
नक्षत्रांची मोतीगौर ओंजळ याच्या उंबरठ्यावर,
या तेजस्वी जखमेच्या अनाम यज्ञकुंडांत
राहिला होता धुमसत हा जन्मापासून आजवर.

याच अव्याहत जखमेच्या अश्वत्थाखालीं
दिसलं होतं याला आपलं निर्वाण,
याच अनद्यतन जखमेच्या हळव्या हातांनीं
यानं केलं होतं आपलं स्वप्न निर्माण.

याच प्रकांड जखमेबरोबर घालतांना सप्तपदी
बायकोनं तोडलं होतं हळूंच मंगळसूत्र,
याच प्रखर जखमेंत किंचाळलीं याचीं पोरं;
हा नव्हे आमचा बाप...हें नव्हें आमचें गोत्र.

माझा मेंदू काल मला दिसला
भंडारी हॉटेलांत तव्यावर बसलेला
म्हटलं आणा चांगला मीटमसाला लावून
तर म्हणे भेज्ज्या खल्लास झाला ऽऽऽ

लिलेहामेर
२१·१०·६१

## इकारस

*"Mama, Papa is wounded"*

ओल्या जखमेचं भळभळ ओझं
लादून घेऊन स्वतःच्याच पाठीवर
चालला आहे बापडा नियतीचा डोंबारखेळ खेळत
प्राक्तनाच्या भणभण टेकाडावर.

याच्या वेदनांच्या अक्षय आरशांत न्याहाळीत
भोगते आहे उर्वशी स्वरूपाचा साक्षात्कार;
अन् तुळशीच्या द्रोणांत गंगाजळ घेऊन आलेले मित्र
करताहेत चीत्कार...करताहेत घूत्कार.

या वेड्या जखमेनंच ओतली होती
नक्षत्रांची मोतीगौर ओंजळ याच्या उंबरठ्यावर,
या तेजस्वी जखमेच्या अनाम यज्ञकुंडांत
राहिला होता धुमसत हा जन्मापासून आजवर.

याच अव्याहत जखमेच्या अश्वत्थाखालीं
दिसलं होतं याला आपलं निर्वाण,
याच अनद्यतन जखमेच्या हळव्या हातांनीं
यानं केलं होतं आपलं स्वप्न निर्माण.

याच प्रकांड जखमेबरोबर घालतांना सप्तपदी
बायकोनं तोडलं होतं हळूंच मंगळसूत्र,
याच प्रखर जखमेंत किंचाळलीं याचीं पोरं;
हा नव्हे आमचा बाप...हें नव्हें आमचें गोत्र.

याची कुंडली निघाली दरोबस्त दगलबाज.
नजर केले तिनं त्याला मेणचटलेले पांचट पंख.
हेच पंख फुलवीत निघाला हा सूर्यबिंब गिळायला
अन् कोसळला भुईवर होऊन खाक...होऊन खंक.

हाच रक्तचिंब शाप सांवरीत आतां
कसाबसा स्वतःच्याच पाठीवर
चालला आहे बापडा रडत रखडत
नियतीच्या नाठाळ टेकाडावर.

प्रेत उतरतांना क्रुसावरून
लोक म्हणतील पिटीत टाळ्या :
वहाव्वा...वहाव्वा...माणूस हवा तर तो असा हवा.
याच जखमेच्या अज्ञात थडग्यांत
एकरूप होत अव्यक्ताशीं
मिटणार आहे निवांत याच्या प्राणांचा काजवा.

लिलेहामेर
२१·१०·६१

## हुतात्मा

रक्ताच्या रासबेरींत तरंगणारी कवटी
खोबणींतल्या काळोखाची खर्वडते नरोटी.

खुंटीवर टांगलेल्या हाताच्या सुरकुत्या
तळव्याच्या रेषा न्याहळतात उसवत्या.

कौलावर संभोगसांवल्यांचा पिंगाणा
रक्तक्षयी कुंकवाचा गेंगाणा धिंगाणा.

म्हाताऱ्या खोकल्याला उब्रळ गंगाजळाची
दमलेल्या दिव्याला धाप दमेऱ्या वांतीची.

राख माती एक होते जेथें जेथें
हलतात पाळणे ज्यांत निश्चेष्ट प्रेतें.

जगण्या-मरण्याच्या झाडावर घुबडाचे डोळे
पंधराव्या अध्यायाचे कानांत गुडीगुप्प बोळे.

पुतळ्याच्या स्तंभावर मुखस्तंभ सापळा
तेवढाच उरला आहे आतां म्हणण्यासारखा आपला.

बाकीचें नाटक आहे केव्हांचें स्मशानलें
रक्ताच्या रासबेरीचे झाले प्राणरिते पेले.

हुतात्म्याच्या पिंडाला शिवणार कसा कावळा ?
शाश्वताचाच शाप आहे बिचाऱ्याला बाधला.

उड उड रे काऊ...हुतात्म्याला आण खाऊ
रक्ताच्या रासबेरीनें तुझे मढवीन पाऊ.

शीव याच्या पिंडाला...शीव याच्या पिंडाला
घाल भाजक्या मातीचा याच्या मुखवट्यावर शेला.

लिलेहामेर
२१·१०·६१

# पावसांत भिजलेले घोडे

पिळलेलें लोखंड वळलेल्या मुठींनीं
वज्राच्या छिन्नीनें तासलेला गंधार;
कृष्णाच्या वक्षावर राधेची चांदणी
रुजतो आहे डोळ्यांत मुका मुका अंधार.

कवट्यांच्या डोंगरावर येतें प्रकाशाचें प्रेत
काळ्याकभिन्न कफनांत लपेटून घेतलेलें;
अमावास्येला जातात कल्पांताचे दिवस
घुबडांच्या घूत्कारांत चिंब भिजलेले.

शेषशाईच्या कानाला लावून प्रश्नार्थक कान
ऑथेल्लो घेत आहे कसला अनद्यतन वेध?
पावसांत भिजलेले हे महॉगनी घोडे
देतात अर्थाला अनर्थाचा छेद...

लिलेहामेर
२२·१०·६१

## अवकाशाचा कसा छान लागला आहे तंबोरा !

स्तब्धतेची आहे आज पिठोरी पौर्णिमा,
मुक्या ओंकाराचें आहे डोहाळजेवण;
जोगियाच्या झाडावरून निथळतात आंसवें,
शून्याच्या ढोलींत घुमतें. धुमें मरण.

अवकाशाचा कसा छान लागला आहे तंबोरा !
नाडीच्या ठोक्यांना फुटतो आहे त्रिताल,
पानांच्या पालखींत बसलेली एक परी
हलकेच घेते ओढून अबोलीची मंद शाल.

आकाशाचा पहा कसा दाटून आला आहे देंठ !
दबलेल्या हुंदक्याला लागत चाललंय् खूळ,
पांखराचें पीस गळतें स्वप्नांचे घुंगुर बांधून,
अल्गद ठिबकतें पाण्यांत एक गूढ... विराट् वर्तुळ.

लिलेहामेर
२२.१०.६१

# लिटल मर्मेड

मी पहात्यें माझ्या निळ्या राजपुत्राची वाट
क्षितिजावर आहे उमटली त्याच्या वादळघोड्याची सांवली.
आकाशासारख्या खोल माझ्या आतुर डोळ्यांत
ज्यूलिएट बसली आहे केव्हांची होऊन भावली.

संगमरवराचें एक अद्‌भुत टपोर पातें
जातें...जातें हंसत लाझारससारखें.
लाटांच्या पदराखालीं डुचमळणारें स्वप्न
पहापहातां होतें पोरकें...होतें पारखें.

सांडून जातात माझ्या पापण्यांचे पंख.
ओंठावरचीं फूलपांखरें मावळतात मंद.
उलुपी येते नि घालते माझी वेणी.
फुलांचा मात्र गेलाय् कधींचा उडून गंध.

समुद्र झाला आहे आतां विश्वव्यापी अश्रू.
नाहीं राहिलें शब्दांना त्यांचें मोनें शब्दपण.
लाटांवर झुलते फक्त जखम-ओली जास्वंद
अन् किनाऱ्यावर रेंगाळतो प्रतीक्षेचा गहन व्रण.

लिल्लेहामेर
२३·१०·६१

## दडपण

हें आकाश
          असं दबा धरून काय बसलंय् केव्हांपास्नं ?
या ढगांचं
          प्रेत कुणींच कसं अजून उचलीत नाहीं ?
झाडांच्या हाडांचीं
          तर झालीं आहेत काडें
हें सगळं...
          सगळं एकदांचं कोसळत कां नाहीं ?

लिलेहामेर
२८-१०-६१

# वर आहे आकाश

वर आहे आकाश
खालीं सगळं भकास
पांखरूं चाललंय् उडत
सावकाश...सावकाश
पोटाखालीं नाहीं
कशाचाच आधार
वर तर सगळा
धुवांधार अंधार
चोंचीत तेवढा आहे
चिंवचिंव कवडसा
अन् घेताहेत पंख
कसलासा कानोसा...

लिलेहामेर
२८·१०·६१

## आत्महत्या

या चंद्राचं डोचकं
असं अचानक कसं फिरलं?
कुणालाच कांहीं
न सांगतां न सवरतां
समोरच्या बर्चवर
त्यानं टांगून कां घेतलं?

लिलेहामेर
३०·१०·६१

## सकाळपासून

सकाळपासून
        सकाळपासून
धुकं कसं आलंय्
        घट्ट घोटून
ऊन बसलंय्
        ऋषि होऊन
निळा कमंडलू
        जवळ घेऊन
मिटल्या डोळ्यांत
        सांवलीची धून
सूर्याच्या ऋचेची
        ओंठावर खूण
सकाळपासून
        सकाळपासून
ऋग्वेदांचा गळा
        आलाय दाटून...

•

लिलेहामेर
३०·१०·६१

# मला भीति वाटते रंगांची

मला भीति वाटते रंगांची...मला भीति वाटते सुरांची,
रंग, रेषा, आकार यांचीं भुतें मानेवर बसतात याची...
व्याधाच्या चांदणीसारखे रंग सारखे बदलत असतात,
चांदण्यांतल्या श्राद्धासारखे सूर सारखे भिववीत रहातात.
रंग, रेषा, आकार या होतात तीन चेटकिणी
तर्कतीर्थ मॅक्बेथ गातो सुसंगतीचीं बडबडगाणीं...
मेपल-ज्यूडासनें केलेला हिव्र्या खिस्ताचा विश्वासघात
अजून आहे माझ्या मनांत...अजून आहे माझ्या मनांत.
रेशमी पियानोचे तुझ्या ते हस्तींदती सूर
अजून कां ग...अजून कां ग छळतें मला तें काहूर ?
सुसंबद्ध अश्वत्थावर लोंबणारा तो कोण मुडदा ?
डोळ्यांवरती आहे ज्याच्या लक्तर झालेला पडदा ?
ठोका खिळे...ठोका खिळे...चढवा शब्द क्रुसावर
सुकेंपण आज मुक्त झालें...छंद झाला अनावर !

लिलेहामेर

१५.१०.६१

## ऑटम्

हें साम्राज्य आहे खोल डोळ्यांच्या ब्राँझचें,
हें स्वप्न आहे पिवळ्या भावगीताला पडलेलें...
हिरव्या रंगाची कबर इथेंच आहे...इथेंच आहे,
मूठभर पानें कोरतात तीवर आंसवांचें गाणें ओलें.

येथें भटकतो सूर्य निशाचरासारखा भणंग,
येथेंच ठेवतो अश्वत्थामा आपल्या जखमा लपवून,
हिंवाळ्याच्या चर्चमधला गारठलेला खिस्त
येथेंच जातो ठेवून आपल्या पुनरुत्थानाची खूण.

ऋतुनगरींत आहे आज विवाहाचा सोहळा.
ऊन बनलें नवरदेव अन् नवरी झाली सावली.
खोल डोळ्यांच्या या ब्राँझच्या राज्यांत
माती सजली करवली...माती सजली करवली.

लिलेहाणेर
१५·१०·६१

## नक्षत्रांच्या बागेंतून...

*(अमिदिओ मॉदिग्लिआनीस)*

नक्षत्रांच्या बागेंतून तूं आला होतास
वास्तवाच्या सांवलींतून निसटून...

आपंल्या पारदर्शक हातांनीं
मारलीस जेव्हां तूं माझ्या दारावर थाप
तेव्हां सैतानाच्या वीर्यातून गेलें
चांगलें ओंजळभर सळसळत अंधाराचें पाप

मी दार उघडायच्या आंतच
कसा झालास तूं दिसेनासा रंगरेषांच्या डोहांत ?
अन् उंबरठ्यावर माझ्या कशाला
घालून ठेवलीस ही रक्तगुळणीची भ्रांत ?

खुळ्या, रक्ताच्या गुळणीनं
का कोण चित्रांतली जास्वंद काढतो ?
डोळ्यांतला अंधार कितीहि उपसला
तरी त्यानं का कॅनव्हास भरतां येतो ?

चांदण्यांच्या शयनमहालांतून आलास
वास्तवाच्या विळख्यांतून निखळून
तेव्हांच कशी नाहीं ऐकलीस
मरण–घुंगुरांची ती नाजूक कुणकुण ?

या मातींत आलास...या मातीचा झालास
अन् उल्केसारखा जळून गेलास.
मागें ठेवलीस आम्हांला जाळणारी
रक्ताच्या गुळणीचीच तेवढी आरास.

एरियलच्या पोटीं जन्माला आलास
प्रॉमिथससारखा मरत मरत जगलास
डोळ्यांतल्या अंधारानं अगदीं कांठोकांठ
भरून मात्र ठेवलास शँपेनचा ग्लास !

१३.१०.६१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ..........
संदर्भ शाखा

## आरशांतल्या माणसाचा हितोपदेश

मित्रा, कशासाठीं एवढी ही यातायात ?
कोण पडणार आहे तुझ्या या नसत्या उपद्व्यापांत ?
अन् विकायला तरी काढलायूस कसला माल ?
कुत्रंसुद्धां ऐकणार नाहीं तुझ्या आरोळ्या बकाल !

फुकट दिलंस तरी, बाबारे, कुणी नाहीं घेणार
तुझं हें चुकार दुःख भिकाऱ्याहून भिकार.
या मालाचा तूंच आहेस एकमेव शाश्वत मालक,
तूंच या ओझ्याचें गिऱ्हाईक...तूंच या बोज्याचा पालक.

म्हणून सांगतों, असा हकनाक ओरडूं नकोस.
फुटक्या फुफ्फुसांतला हुंदका बाहेर सांडूं देऊं नकोस.
रहावलंच नाहीं तर विव्हळ मनांतल्या मनांत :
सर्वेऽस्तु दुःखिनस्सन्तु । सर्वे सन्तु रडामयाः ॥

७·४·६४

## कावळा

गोखल्यांच्या पुतळ्यावर
येऊन बसतो कावळा.
गोखल्यांच्या तें गांवींहि नसतं;
त्यांचा चेहरा तसाच बावळा.

गोखले तरी काय करणार
या तरपासलेल्या जगांत ?
रहातां येईल तेवढं रहावं घडीबंद
असावा टाईम्सचा अग्रलेख खिशांत.

नेमके...नेमस्त...नामदार गोखले...
पुतळा झालेत ना ते आतां !
कावळा येऊं दे...कावळा जाऊं दे
तोच माणसाच्या पिंडाचा त्राता.

गोखले चतुःशृंगीएवढे मोठे
तर कावळा कैलासाहून मोठा
म्हणून तरपास जगांत येतांना
द्रष्टे शोधतात छोटासा गोठा.

७·४·६४

## स्टेशन

स्टेशन...
स्मशानासारखें निर्विकल्प.
फलाटाच्या धारेवर
विडी ओढणारा महारोगी...
(गाडी आली तर
याच्या विडीवरून नाहीं का जाणार ?)
करकोचा झालेला सिग्नल
घाटतो तिमजली भांग
सूर्याच्या कळकलेल्या भांड्यांत...
तारेवर पांखरांचा
कवडसाहि नाहीं...
उभ्या उभ्या पेंगणारें
टी-सीचें बुजगावाहुलें...
रूळ फक्त अंथरलेले
आरपार आकाशांतून...
पलीकडे...
ढगांची मालगाडी
नॉट टु बी
लूज शंटेड...

८·४·६४

## दगड

दगडांतहि परी असतात.

कांहीं असतात नुसतेच दगड.
कांहीं विठ्ठल-रुक्मिणीसारखे परखड.

कांहींत नुसतेंच मैथुन भिनलेलें.
कांहीं अध्यात्माचे बोट लागलेले.

कांहीं रानड्यांचे...कांहीं गोखल्यांचे,
कांहीं टिळकांचे...कांहीं छत्रपतींचे.

कांहीं गोरेपान कौमार्यासारखे.
कांहीं काळ्या घोड्याच्या वृषणासारखे.

कांहीं कोडगे...कांहीं घनचक्कर.
असला तर एखादाच रोदांचा 'थिंकर'.

८·४·६४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ५४३५३ वि. काव्य
१९८८ ११|३|७१

## निरर्थालाहि अर्थ येऊं पहात होता...

*(आल्बेर कामू यांच्या स्मृतीस.)*

त्या दिवशीं अचानक
        असें काय झालें ?
तुझ्या मोटारीचें डोकें
        अकस्मात् कसें फिरलें ?

अचानक...
अकस्मात्...
अघटित...
अपघात...
निरर्थालाहि कांहीं अर्थ येऊं पहात होता.
पण तो झाला भस्मसात्...

तुला विचारलें तर तूं कांहीं बोलत नव्हतास.
चुरगाळलेल्या बगळ्यासारखा मान टाकून बसला होतास.
गांठाळत चाललेल्या रक्ताच्या नुक्त्यावर
एक डांस तेवढा गूं गूं करीत होता.

म्हटला तर या साऱ्याला अर्थ होता.
म्हटला तर कांहींच नव्हता.
नुसता अॅब्सर्ड काळोख...

८.४.६४

# पुलावरच्या मुली

*(एडवर्ड मुंक)*

दबा धरून राहिलेल्या अवकाशानं
हा डोह पार ढवळून काढला आहे.

ओळखीचं आसंमत...
या मुलींनाहि कुठं पाहिल्यासारखं वाटत आहे.

आतां तर त्या प्रतिक होऊन उभ्या आहेत
काळ्या डोहांत नजर हरवून...

समाधिस्थ आकार...
लफ्फेदार पिंगा घालणारा उत्तरवारा.

झोंपाळ्यावरील रेषा
कुंचल्यावर आकाशपाताळ टिपणाऱ्या...

वस्त्रगाळ प्रकाश...
प्रेतासारखा थंडगार.

असं एकाकीपण...असं एकाकीपण
या इथल्याच पुलावर...

९.४.६४

## नागासाकी

*(हिरोशीमाहि चालेल)*

पृथ्वी उरींपोटीं फुटेल
तेव्हां वाचा नसलेला माणूस विचारील:
या साऱ्याचा अर्थ काय ?

त्या दिवशीं परमेश्वरापर्यंत जाऊन भिडणारी
मेघगर्जना मातीचा गर्भ फाडून बाहेर येईल
नि या साऱ्याचा अर्थ महाभूतांना सांगेल.

त्या दिवशीं अवयव नसलेलीं माणसं
जथ्याजथ्यानं येतील.

जे पुण्यात्मे असतील त्यांनाहि तें दिसेल.
जे पापात्मे असतील त्यांनाहि तें पहावयास मिळेल.

वडाच्या पानावर पडल्या पडल्या
पायाचा अंगठा चोखणारें मूल...
अंगठाच नसलेलें...

९.४.६४

## डोळ्यांवर अशी झोंप आहे...

डोळ्यांवर अशी झोंप आहे
सुस्त जेवलेल्या सीझरसारखी.

म्हणे हा मेलेला माणूस
उठायचा आहे आज मेलेल्या झोंपेंतून.

भलतंच कांहींतरी.
मेलेला माणूस कधीं उठतो काय ?
माणूस मरतो म्हणजे काय होतं ?
माणूस मरतो म्हणजे मरतोच तो.

डोळ्यांवर अशी झोंप आहे
पांढऱ्या चिंध्यांतील लाझारसासारखी.

पण हा कबरीवरचा दगड
असा सरकतोय् काय भुतासारखा ?

मेलेला माणूस कबरींत नाहीं
मेलेला माणूस कबरींत असेलच कसा ?

माणूस मरतो म्हणजे कबरीपलीकडे जातो.
मेलेला माणूस कबरींत असेलच कसा ?

डोळ्यांवर अशी झोंप आहे
गाढवावर बसलेल्या बाळंतिणीसारखी.

११·४·६४

## चार रंगवेडे

सूर्यफुलांच्या रानांत
वणवा लागला;
कुणी कानफाट्या
त्यांत जळून खाक झाला.

एक आला इथें
जोगवा मागीत
बसला गुल्मोहरावर
भुताटकी भोगीत.

एकानं घेतला
निळीचा मळा
विदूषक होऊन त्यांत
लोळ लोळ लोळला.

एकानं घुसळलं
उन्हा–मातींत अंग.
अमृताच्या एका पेगांत
औट झाले रंग.

११·४·६४

## बेटोवन

दिशांच्या पलीकडून दौडत येणारा
घोडा दिसतो आहे मला
आयाळ आभाळांत भिरकावीत येतांना,
पण त्याच्या टापांचा
आवाज कां होत नाहीं ?

जन्मभर ज्यांची पाठराखण केली
ते सूर कुठं गेले
मी पंचमांत विलीन होण्याच्या क्षणीं ?

ही तर माझीच कॉफीन...
तिच्या झांकणावर
खरं पांखरूं कां बसविलं नाहींत ?

संगीताच्या कॅथेड्रलमधला ख्रिस्तसुद्धां
असतो का असाच मुका
या कॉफीनीसारखा ?

सिंफनी...सिंफनी...
सांग ना ग ?
तूं सुद्धां कां अशी उभी
मुक्या चित्रपटांतल्यासारखी ?

११·४·६४

## शब्द

*"Obscenity, I obscenity in the obscenity of thy obscenity."*

HEMINGWAY.

शब्द बिचारे
भोळेभाबडे असतात.
त्यांची एवढी परवड कशासाठीं ?

डागळलेलीं अंगवस्त्रं मात्र
त्यांवर टांगूं नका.
खुंट्या असल्या तरी
त्या सतारीच्या आहेत.

शब्द...
स्वरपुष्पांचे अक्षर झुबके...
क्रौञ्चमिथुनाच्या वेळचें आर्त
तुमच्या वृंदावनांत आणून टाकणारीं पांखरं.

लिपी...
खजुराहचें देऊळ...
बडव्यांना येथें थारा नाहीं.

सगळेच शब्द कांहीं
चार अक्षरी नसतात
कांहीं दोन अक्षरांचे लग्न लावणारे ब्राह्मण...
लिंग...योनी...
किती सुंदर !

त्या बाईचा नवरा
कमरेखालीं पांगळा...
शब्दांना ती थोडीच भीक घालणार आहे
पावसांत विवस्त्र नाचतांना
कमरेखालीं धड असलेल्या पुरुषाबरोबर ?

अन् ती फॅनी...
शरीरावर प्रेम करणारी निर्व्याज वेश्या...
शब्दांच्या वाटेवर थोडाच भेटणार आहे
तिला पहिला बागवान
योनीपुष्प खुडणारा ?

शब्द बिचारे
अगदीं शुचिर्भूत असतात
त्यांच्यावर असा चिखल टाकूं नका.

११·४·६४

# न्यायाधीश

माय लॉर्ड,
गाभारा नसलेलं हें दगडाचं देऊळ...
यूवर ऑनर,
फुटक्या बुब्बुळांची ही नेत्रपेढी...
माय लॉर्ड,
नुसता बकवा...नुसता बकवास...
यूवर ऑनर,
उलटे टांगलेले सोलीव बोकड...
माय लॉर्ड,
खरपूस भाजलेले मसालेदार मेंदू...
यूवर ऑनर,
शब्दांच्या वृषणाला चाप लावणारे जेलर्स...
माय लॉर्ड,
सुईच्या अग्रावर मलखांब करणारा ढेंकूण...
यूवर ऑनर,
कलमांचं मलम लावून कशी बरी होणार ही खरूज ?
कुणी कुणाला न्याय द्यावा...कशासाठीं हा कावा ?
माय लॉर्ड,
प्रलयाच्या रात्रीनंतर फुटणाऱ्या पहाटें
कोण करील तुमच्या बेड्यांना पॉलीश ?
यूवर ऑनर,
प्लीज टेक यूवर इलेक्ट्रीक चेअर...

१३·४·६४

## मोकळा

राजीनाम्यांत मी लिहिलं होतं :

परमहंस परिव्राजकानामासनशय्याभ्यां भूमौ ब्रह्मचारिणाम् ।
मृत्पात्रं वा अलाबुपात्रं वा दारुपात्रं वा ।
वर्षासु ध्रुवशीलो एकाकी यतिश्चरेत् ॥

निरोप देतांना सहकाऱ्यांनीं
हातांत दिली
एक लंगोटी
नि डालडाचं रिकामं डबरं...
ते घरीं गेले...
मी...

१३·४·६४

## नेपोलीयन बोनॅपॅट्

मी नुसतं म्हटलं :
माझं नांव नेपोलीयन बोनॅपॅट्
तर मला ठाण्याला आणून टाकतात लेकाचे.
म्हणतात कसे
हेंच तुमचं सेंट हेलेना बरं का नेपोलीयनपंत !

या लोकांची ट्रिक मला का कळत नाहीं ?
तरी बरं झालं परवां
नेल्सन आला होता चालून व्हिक्टोरियामधून.
दगडांनी ठेंचून ठेंचून मी मारला त्याला.
नाहीं तर धडगत नव्हती या उंटावरच्या शहाण्यांची.
अगदीं वैताग आलाय मला.

माझ्यावर कुणी विश्वासच ठेवायला तयार नाहीं.
लहानपणीं बोरं घेतलीं होतीं
एका म्हातारीकडून शाळेजवळच्या.
तिचे एकदोन आणे द्यायचे राहिलेत.
ते देऊन टाकले कीं
चाललों आम्ही आमच्या खऱ्या सेंट हेलेनाला.
मग कोण कशाला थांबतोय् इथं ?

पण अलीकडे
दोन आण्यांचं नाणं चालत नाहीं म्हणतात.
म्हणजे मग आमची
सुटकाच नाहीं कीं काय कधीं शहाण्यांच्या जगांतून ?

१३·४·६४

## एक होता एक : एक आपलं असंच बालगीत

एक होता एक
त्याच्या बापाचं नांव होतं टा.
नि आडनांव होतं च
संपूर्ण नांव : एकटाच.

तो गेला दोन मुलींकडे
त्या म्हणाल्या : तूं एकटा, आम्ही दुकट्या.
तिघंजण रहाणार कुठं रे, भामट्या ?

मग तो गेला तीन माकडांकडे.
तीं म्हणालीं : तूं एकटा, आमचं त्रिकूट.
चौघांचं कसं जमायचं मेतकूट ?

मग तो गेला चार दिशांकडे
त्या म्हणाल्या : तूं एकटा, आम्ही चौघी
एकच नवरा आम्हांला कसा बाळगी ?

मग तो गेला पांच इंद्रियांकडे.
तीं म्हणालीं : तूं एकटा, आम्हीं पांच.
देऊन देऊन अशी कितीशी देणार तूं लांच ?

मग तो गेला सहा ऋतूंकडे
ते म्हणाले : तूं एकटा, आम्हीं सहा
कसं झेंपणार तुझं तूंच पहा.

मग तो गेला सात पऱ्यांकडे.
त्या म्हणाल्या : तूं एकटा, आम्ही सात.
कसं भागायचं आपलं या दिवसांत ?

मग तो गेला आठ प्रधानांकडे.
ते म्हणाले: तूं एकटा, आम्ही आठ.
म्हणजे राज्यच आटोपलं कीं पाठोपाठ !

मग तो गेला नऊ रसांकडे.
ते म्हणाले : तूं एकटा, आम्ही नऊ.
शिवाय आणखी आहेत आम्हांला भाऊ.

मग तो गेला एका शून्याकडे.
तें म्हणालें : तूं एकटा, मी एकटा.
नेसूं आळीपाळीनं एकच मुकटा !

१३·४·५४

## एक गाणें

नाचा, नाचा, नाचा, मन मानेल तसं नाचा.
टीकाकार चाचांची आज गेली आहे वाचा.

आज आशयाशीं झाला आहे एकरूप आकार.
अभिव्यक्तीशीं करतो आहे व्यभिचार गोलंकार

जन्म गेला चाचांचा सगळा तोल संभाळण्यांत
अखेर कसे बुडाले ते कँटसाहेबाच्या तळ्यांत ?

बोलवा म्हणावें आतां कुठल्या तुमच्या मित्राला.
त्या सूसान लँगरला...त्या भयाण ओसबोर्नला.

सुतकी चेहरा करून चाचा उसवीत होते मेंदू
भरभर भरभर झेलीत होते सौंदर्याचे चेंडू.

कुठला दगड पाहूं आतां होतो यांचा पुतळा !
कुठला हरवल्या कथेचा दाटून येतो तें गळा !

देवानें जातां जातां एवढें तरी करावें :
भट मंत्र म्हणत असतां चाचांनीं उठून न बसावें.

१५.४.६४

# देवापुढचा दिवा

देवापुढचा दिवा
असूं द्या रे तसाच.

आपणच देवाला अंधारांत ठेवलं
तर हरवून टाकील तो आकाश.
या खोलीच्या खबदाडांत
तेवढाच चमचाभर प्रकाश.

कितीसं तूप असं
लागणार लागून लागून ?
एक फुलवात घातली
कीं सगळं ऊनच ऊन.

दिसूं दे जरा देवाला
हा अनादि अंधार;
लागला तर लागूं दे
एकदां कोमल गंधार.

१५.४.६४

## ऑफेलिया : १

मी वेडी...वेड लागण्यापूर्वींहि मी वेडीच होत्यें.
वेडाच्या आधीं वेडच असतं अन् त्याच्याहि आधीं वेडच.
वेड पूर्ण आहे, वेड संपूर्ण आहे;
वेडांतून वेड काढून टाकलं तरी नुसतं वेडच उरतं.
माझा प्रियकरहि कित्ती कित्ती वेडा आहे !
पण तो राजपुत्र आहे म्हणून शहाण्याचं सोंग पांघरीत आहे.
मी त्याला म्हटलं: तूं असा वेडाच रहा,
तर म्हणतो कसा : आधीं...आधीं सूड सहा...

खरंच या वेडानं किती वेड लावलंय् मला !
आतां हॅम्लेटवर नाहीं माझा मुळींमुळींसुद्धां लळा
वेड कित्ती चांगलं असतं, गुणी असतं, प्रेमळ असतं !
कुणाच्याच कानांत कसलंच विष तें घालीत नसतं.

२५·४·६४

## ऑफलिया : २

किल्ल्याच्या बुरुजावर कोण उभं आहे पारदर्शक ?
मी प्रवाळद्वीपाची राणी...माझें शेवाळाचें कथ्थक.
कांहींबाही भलतंसलतं मला कांहीं सांगूं नका.
माझ्या राज्यांत लाख चंद्र...त्यांचें झुंबर फोडूं नका.
माझा झगा लग्नाचा पाण्यावरच्या लहरींचा.
झिमझिम माझ्या बुरख्यावर पाऊस लिली-फुलांचा.
बुरुजावरून किल्ल्याच्या कोण मला बोलावतं ?
कुठलं गाणं...कुठलं गाणं निळा मेणा सजवतं ?

हा काळोख कुठून आला ? माझ्याच वाटेंत कुठून आला ?
प्रवाळद्वीपाच्या राणीला कुठं पळवून नेऊं लागला ?
तळ्यामधून कुणीसं सारखं मला खुणावतंय् ;
शेवाळाच्या कुठल्या जाळींत हें माझं लग्न वाजतंय् ?

१५·४·६४

## प्रेषित

जो प्रेषित असतो
त्याच्या हातांत ट्रॅन्झिस्टर असतो.
प्रेषित लोकांना झोंपूं देत नाहीं.

जो प्रेषित असतो
तो कॅशियससारखा लुकडा असतो.
प्रेषित कधींच टॉनिक घेत नाहीं.

जो प्रेषित असतो
त्याच्या खांद्यावर पोपट असतो.
प्रेषित फक्त त्याच्याशींच बोलतो.

जो प्रेषित असतो
तो मुळांत मुळीं नसतोच.
प्रेषिताचा असण्यावर विश्वास नसतो.

१५-४-६४

## शंख

अनन्ताच्या फुलामागून
उगवणारं सूर्यबिंब.

अधून मधून उगीचच
गुलबाशीचीं गंधबोटं.

तांबूसतापल्या दूधाची
पारदर्शक साय.

प्रणवाचा पाळणा,
प्रलयाचा राणा.

इथं गव्हाळ वाळूवर,
तिथं कुरुक्षेत्रावर...

१५·४·६४

# वडील देवपूजेला बसतात

वडील देवपूजेला बसतात
तेव्हां थेट पेशव्यांसारखे दिसतात.

ते रुद्र म्हणूं लागले
कीं ताम्हणांतले देव चळचळ कांपतात.

पूजेसाठीं त्यांना इतकं गंध लागतं
कीं माझे हात पार वळून येतात.

वडील मात्र आपल्याच नादांत
देवांना आंघोळ घालीत असतात.

गोऱ्या थुलथुलीत वड्लांभोंवतीं
धूपाचे फाये दरवळत असतात.

वारा प्यालेल्या वासरांसारख्या
चांदीच्या घंटा किणकिणत रहातात.

बेलाचीं पानें, तुळशीच्या मंजिरी,
दुर्वांच्या जुड्या खुषींत असतात.

फुलांच्या कोषांत देवाच्या मूर्ती
हळूंच येऊन लपून बसतात.

निरंजनांतील फुलवातींना
सूर्याचे डोहाळे लागूं लागतात.

एकाच समयींतल्या एका ज्योतीचीं
तसबिरींत लाखों बिंबें दिसतात.

नैवेद्याच्या बिट्टुकल्या वाटींत
वडील साखर, केशर घालतात.

देव्हाऱ्यांतील सगळ्या मूर्ती
बाळकृष्ण होऊन रांगूं लागतात

१७·४·६४

## निरोप

पहातांना अंधाराकडे, अंधारांतून
कितीतरी वेळ होऊन गेला.
बापड्या फटी, भोंकं नि शून्यत्व.
तुझे हात माझ्या गालांवर, असंवेद्य त्यांचा स्पर्श
मला तो नको आहे असं तुला कुणी सांगितलं ?
पण माझं मन बधीर झालंय् त्याला मी काय करूं ?
वेदनांची मिठी पायांना नसती
तर एका हातानं आणलीं असतीं मी सूर्यमंडलें खुडून
मातीच्या परीघरेषेवर कसाबसा मी उभा
छातीवर झेलीत वादळांचे तडाखे
पण हा तोल तरी मी किती युगें संभाळायचा ?
काळोखाचं आमंत्रण मिळाल्याला किती तपें लोटलीं आहेत !
हवीहवीशी वाटणारी तुझी मिठी...
तिच्या सर्पथंड विळख्यांतून झालों कसाबसा मोकळा...
हें केशरी प्रस्थान ठेवतांना
समाधान एवढंच जोगी आत्म्याला
तुझ्या गूढ डोळ्यांच्या पादुका आहेत
कफनीच्या टोंकाशीं नाजूक बांधलेल्या...

१७·४·६४

## भंकस

उदाहरणार्थ वगैरे अगदीं वैतागून गेलोंय् म्हणा ना!
वडील म्हणतात तुम्ही असेच भटकत रहा
दोन्ही हातांनीं करीत ठणाणा...
च्यायला गोणपाटाच्या बुशशर्टावर
काय मस्त दिसेल म्हणतां तांबडी पँट!
पण आमचे वडील म्हणजे अगदींच अर्क
एक जस्ताचा पैसा करणार नाहीत ग्रँट.
टिळक एका बाबतींत मात्र ग्रेटच.
पुणेरी जोड्यांपुढें किर्केगोर म्हणजे शेंबडं पोर.
तांबड्या पँटवर टिळकांचा जोडा
म्हणजे नौटाकावर विडयांचा जोर.
आतां उदाहरणार्थ वगैरे हेंच पहा ना!
तीर्थरूप म्हणतात तुम्हीं लग्न करून टाका.
भडव्यो, लग्न करून काय करा!
खालीं करा अर्धी तुमच्याच खांका.
टिळक-आगरकर नशा करते,
गोखले बोकडदाढी ठेवते
तर आमचे पिताजी झेन म्हणून
एव्हांना ब्राझीलला गेले नसते?
'आत्महत्याच आमचा जन्मसिद्ध हक्क'
कां केली नाहीं टिळकांनीं ही घोषणा?
स्वराज्य काय सालीं पोरसोरं मागतात.
तंबाखूचीं पानें खातो तोच खरा ससाणा.
अगदीं भंकस वैताग येऊन राहिलाय.

कशांतच कांही राम नाहीं. असो.
जरा कातर घेऊं का हो तुमची ?
नाकांतले केंस थोडे काढीन म्हणतों.
उदाहरणार्थ वगैरे हें असं आहे.
आमचे वडील रोज आंघोळ करणारे...
कशाचा कशाला काय अर्थ आहे ?

१७·४·६४

## रान

रान उभें एल्सिनोरच्या किल्ल्यासारखें तटस्थ
इथंच आहे काळनदीचा उगम कुठंतरी
इथल्याच झाडाझुडपांत तिचं गुप्त पाताळगमन
रान उभें इजिप्शियन ममीसारखे व्रतस्थ.
इथंच आहे प्राक्तन-सूर्याचा उदय कुठंतरी
इथल्याच अवकाशांत त्याचं गूढ अस्तंगमन
रान उभें हडळीसारखें प्रेतवत्...
दुरून दबत दबत येणारा अदृश्य ढोलाचा संथ आवाज...
नादब्रह्माचा ओंकार फडा धरून इथल्याच नीरवतेवर...
रान अकस्मात् झपाटल्यासारखें होतें
झाडाझुडांना वळसे घालीत नागमोडी
भयभीत जातो कुणा रानपांखरांचा भयानक आक्रोश
भुकेच्या पंज्यांनीं रक्तबंबाळलेला...
रान तसेंच उभें असतें तपस्वी करकोचासारखें...
थोडा वेळ गडीगुप्प अलिबाबाच्या गुहेसारखें
अन् मग
श्वापदजोडीच्या संभोग-किंकाळ्या...

१७-४-६४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. 98630

## उन्हाशीं बसलेला महारोगी

उन्हाशीं बसलेला महारोगी
असतो उभ्या अस्तित्वाला रफू करीत.
चिरगुटांतून त्याच्या दिसते आरपार
गोरी व्हीनस दोन्ही खांदे तुटलेली.
डोळे खिळलेले सूर्याच्या रक्तबंबाळ बुबळावर
हातांच्या तळव्यावर हिशेब गिचमिड शाश्वताचा.
भिंताडावर तशीच सावली
मुखवटा लक्तरांत लपेटलेली
शरीर लागलेलं झडूं सापाच्या कांतेसारखं
मनांत मात्र जिद्दीचा हळदमळा ओथंबलेला...
उन्हाला फुटेल का कधीं भुईघोळ दाढी ?
उन्हाचा दिसेल का याला चुणीदार झगा ?
उन्हाला फुटतील का कधीं करुणेचे हात ?...
उन्हाशीं बसलेला महारोगी
प्राक्तनाशीं बसलेला नपुंसक भोगी.

१८-४-६४

## सगळेच आई बाप

सगळेच आईबाप घेतात
थॅलिडोमाईडच्या गोळ्या...
कृष्णाष्टमीला घड्याळ हात जोडून उभं असतं
तेव्हां आपोआप हलूं लागतो येणाऱ्याचा पाळणा;
हंसत असतो त्यांत कंसानं आपटून मारलेला विद्युत्गर्भ
सगळेच वसुदेव-देवकी तेव्हां
कसे तृप्त असतात शहाळ्यांतील खोबऱ्यासारखे...
आकार धरण्याआधींच प्रेतयात्रा निघाली असती
प्रत्येक गर्भाची तर आईबापांनीं कशाला धरलं असतं
हें तेलचिंधीचं व्रत ?
पण फ्लीट मारल्याशिवाय ढेंकूण थोडेच मरणार आहेत !
म्हणून तर हें थॅलिडोमाईडचें खत
आईबाप कायद्याला भीत नाहींत;
कायद्याचा गर्भ ते फायदेशीरपणें पाडूं शकतात.
गर्भाशीं ते वायदाच करीत नाहींत.
तो जीव आईबापांचा नसतोच मुळीं
जो प्रेतयात्रा चुकवून अंगाईगीतं ऐकत राहतो.
अशा जिवावर दत्ताचा अभयहस्त असतो.
तेलचिंधीचा फांस याच्या गळ्याला लागत नाहीं.
कृष्णाष्टमीला घड्याळ बारा मंत्र पुटपुटत असतं
तेव्हां आपोआप हलूं लागतो आलेल्याचा पाळणा
हंसत असतो त्यांत कंसाला कंस घालून आलेला आठवा अवतार.

सगळेच नंद–यशोदा तेव्हां
कसे अंगठे चोखीत उभे असतात विश्वस्तपणें...

१८·४·६४

## थुंकतों तुझ्या करुणेवर

खवळलेल्या समुद्रांत उभा निडर खडक उत्तेजित इंद्रियासारखा.
अ-शरीर माणसाचा तडफडणारा तीळ त्यावर.
समुद्रापलीकडच्या जगाची प्रतीक्षा करणाऱ्या पांचूदार वनस्पती...
अंहं, परमेश्वरा, अजून पाठ जमिनीला लागली नाहीं माझी !
असा सुखासुखी कसा जिंकूं देईन मी तुला मैदान ?
अजून एखादं विमान येईल...अजून एखादं जहाज येईल.
मग या इंद्रनिळ्या पाण्यांत तुझ्याच अमंगलमूर्तींचं महाविसर्जन.
कालत्रयीं लागूं देणार नाहीं मी माझ्या पाठीला वाळू...
एकच कर...खेळायचंच असलं तर मर्दासारखा खेळ,..
भंवतालीं माजलेला बाहुल्यांचा हा कळसूत्री खेळ आवरतां घे...
पिसाट काळोखाचा लोळ जरा थोपवून धर...
म्हणे शेवटचा पडदा पडण्यापूर्वीचा हा धांदरट प्रवेश...
वेदनेच्या क्रोधायमान लाटांशी चाललेली तर्काची अखेरची धडपड.
मला पक्कं माहीत आहे...
शेवटीं तूंच निर्माण केलेल्या या लाटा
घेऊन जातील माझ्या अस्थि वाळूच्या किनाऱ्यावर
अन् कुठल्यातरी चौतभर मातट कागदावर
उमटतील थरकांपरीं अक्षरं :
        हें प्रेत बुडण्याआधींच बुडालं होतं.
पण हे देवाधिदेवा, किती काळ आणखी
फसवीत रहाणार आहेस तूं स्वतःच स्वतःला ?

तें पहा...तें पहा...तें पहा लागलं माझं प्रेत किनाऱ्याला
अन् त्या पहा...त्या पहा...त्या पहा फुटूं लागल्या त्याला फांद्या
...याच झाडावर, गड्या, तुला आत्महत्त्या करायची आहे!
मी तर चाललों पुढें
थुंकीत तुझ्या करुणेवर!

१९·४·६४

## कॅलिबन्

हें बेट कुठें सुरू होतें? कुठें संपतें?
एरिएलच्या मनांत सारखें गाणें कोण गुणगुणत असतें ?
परवां आला होता जख्ख म्हातारा प्रॉस्पेरोच्या गुहेसमोर
म्हणालाः शोधतोंय मी हरवलेला दुवा!
मला माहीत होतं. तो दुवा माझ्या अंगावरील केंसांत होता;
पण चकार शब्दानं मी त्याला बोललों नाहीं.
काय करायच्याहेत नसत्या चौकश्या आपल्याला ?
कुठं का सुरू होईना बेट...कुठं का संपेना!
हिंडावं...हुंदडावं...हंसावं...रडावं...
झाड बुंध्यापासून गदगद हलवावं...
पण कधीं कधीं एकच वाटतं घडावंसं.
एकदां तरी तरी ती एकांतांत भेटावी
नि तिच्या गुल्जार बोटांत मी अंगठी घालावी
हरवलेल्या दुव्याची...

१९.४.६४

## बुबुळं मालवल्यावर मग...

*(त्याचे डोळे जात आले आहेत.)*

हें सारं आतां नीट सांठवायला हवं.
हें आकाश...हा वृक्षोत्सव...
या होड्या...हा समुद्रोत्सव...
हे काळे कुळकुळीत कावळे...
या भुऱ्या भुरभुरीत चिमण्या...
हे हळद पिणारे बगळे...
या चॉकलेट खाणाऱ्या मैना...
हा गूढ गहन किनारा...
या विचित्रमात्र तारा...
ही फुलं खुडणारी मुलगी...
या फुलाफुलांच्या सलगी...
ही गोजिरवाणी सकाळ...
या उदासवाण्या रात्री...
हा प्रतिपदेचा चंद्र...
या छाया गात्रोगात्रीं...
ही बकुळ...ही रांगोळी
बुबळं मालवल्यावर मग...
मीच देऊळ...मीच पाकोळी...

१९.४.६४

## आठवण

तूं कशी दिसत होतीस तें आठवण्याचा प्रयत्न करतोंय्.
नजर भिडवावी आकाशाच्या तटस्थ नजरेशीं
तों दिसतात दोन गोजिरवाणे हात
चंद्रबिंबावरून रेशमासारखे फिरतांना;
पण क्षणार्धांत ते असे पांढरेफटिक कां पडतात
आभाळाला खळं पडल्यासारखे ?
गोरजाच्या देवळांत किणकिणणाऱ्या घंटा
काढतात चित्र तुझ्या डोळ्यांवर लहेरणाऱ्या लबाड बटेचं
पण दिवेलागण होतांना तुझ्या हिर्व्या बांगड्या
कां डसतात मनाला भुकेल्या हरणटोळीसारख्या ?
कधीं गुल्मोहरावर होतो भास तुझे ओठ पाहिल्याचा,
कधीं डोल्काठीवर येऊन बसतं पांखरूं तुझ्यासारखंच नाक असलेलं,
कधीं कृष्णकमळीच्या वेलीवर दिसतात तुझ्या भुंवयांच्या कमानी,
कधीं तळ्याच्या गालांवर तुझ्या गालांवरची हवीहवीशी खळी.
प्रयत्न न करतांहि अगदी सहज आठवतें सारं,
अगदीं जसं कांहीं नुकतंच पाहिल्यासारखं
पण घोंटाळा करतात ते तुझे डोळे.
तळ नसलेल्या डोहासारखे काळोखानं तुडुंबलेले.
दोन बदाम पाताळांत पुरलेले...
हा बुब्बुळं नसलेला निव्वळ काळोख...
अन् डोळे फुटलेली माझी विसरभोळी नजर...
सारखा प्रयत्न करतोंय् पण कांहीं जमत नाहीं.

२५·४·६४

## बांग

मशिदींतून येणारी बांग
जाते चंद्रकोरीला वळसे घालून.
आलापाची आरास मालवीत.
अस्सल बांग फक्त एकच.
छाती ढगांना लावून
कुकारणाऱ्या कोंबड्याची.
अजानाची आरोळी म्हणजे नुसती बनवाबनवी.
नुसता प्रतिध्वनि.
अस्सल बांग फक्त एकच.
सूर्याचा तुरा लावून
ॐकारणाऱ्या कोंबड्याची...

२५·४·६४

## चित्र

इकडे सूर्याचा कवडसा
तिकडे चंद्राचा आडोसा
मध्यें एक मनविसरली मुलगी.
तिची नजर हरवलेली
तिचीं स्वप्नें उसवलेलीं
मध्येंच क्वचित् छळणारी आठवण.
इकडे ठणकणारी रात्र
तिकडे गुणगुणतीं नक्षत्रं
मध्येंच एक गोठलेला झोंपाळा.
इकडे ही मुलगी
तिकडे तो झोंपाळा...
मध्येंच आकाशाची जास्वंद—जांभई...

२७·७·६४

## इडिपस

कुठल्या ज्योतिषाकडून करून आणली होतीस
तुझी कुंडली कुठल्या मुहूर्तावर ?
नक्षत्रांना आग लागली होती
अन् रात्रीच्या गर्भावर सांवट पडलें होतें घुबड-घूत्कारांचें
तें दिसले कसें नाहीं तुझ्या हाडमांस डोळ्यांना ?
मातृसंभोगी प्राक्तनानं
आकाश गदगदा हालविलं
तुझ्या कुंडलीवरील ग्रहमंडळें पार उघळून देतांना
तेव्हांच कां झडून गेलीं नाहींत तुझीं निर्व्याज, निरपराध इंद्रियें ?
दुःखांत सुख एवढंच
कीं दैवानं एक तरी खैर केली आहे.
ज्यांचा तूं जन्मदाता झालास
त्या तुझ्या भावंडांचे हात धरून
वाळवंटांतून जातांना दिशा नसलेल्या
तुझ्या पावलांवर संतत अभिषेक होणार आहे
तुझ्याच थंडगार रक्ताचा
तुझ्याच ओरबाडल्या डोळ्यांच्या फुटक्या झारीमधून...
प्राक्तन कुणाला कसं सुख देईल, हें सांगतां येत नाहीं !

२७·४·६४

## एक पोरकट आठवण

आप्पा गेले तेव्हां मी ढारढूर झोंपलों होतों.
मुका अंधार मला
कठपुतळींचे खेळ करून दाखवीत होता.
पण या बाहुल्यांच्या दोऱ्या
आप्पांच्या हातांत कुणी दिल्या ?
सकाळीं खळ्यांत...
सुंभाचे तुकडे नि गुलालाचीं पावलं...
नाकांत जळत्या शेणीचा वास...
ऊन गारुडी झालं होतं.
हातांत सूर्याचं डमरू...पायांत सावलीचं घुंगरू...
कठपुतळींची दोरी त्यानं
शेपटीवर उभ्या राहिलेल्या सापासारखी उभी केली.
आप्पा तिच्यावर सरड्यासारखे तुरुतुरु चढले...
उन्हाचा खेळ खलास झाला.
मी टाळी वाजवायला गेलों पण वाजेचना कांहीं केल्या.
मी उन्हाला चंद्राचा पैसा दिला.
आजूबाजूला पाहिलं तर
गर्दीतल्या सगळ्याच माणसांना फुटला होता
माझा कोरा करकरीत चेहरा...
आप्पा रात्रीं गेले.
त्यानंतरची ही सकाळ...
विस्मृतीच्या सांपळ्यांतून निखळलेली...

२७·४·६४

## क्लिओपात्रा

पहा...पहा...पाहून घे एकदां माझ्या डोळ्यांत आपलं प्रतिबिंब
अन् तुझ्याहि डोळ्यांच्या मण्यांवर
कोरून ठेवूं दे मला जातां जातां माझ्या नासिकेची चंद्रकोर.
डंख करशील तेव्हां मुळींसुद्धां घामाघूम होऊं नकोस.
विश्वाच्या महापुरांतून शीड फडकावीत जाणारं
माझं जहाज निघालं आहे शून्याशीं शय्या करायला
हें विसरूं नकोस...अन् हेंहि विसरूं नकोस...
आधीं दांतांनी उसवायच्या आहेत हळुवार
दोन अलवार चांदण्या डाळिंबवनांत एकांत करणाऱ्या...
मग घ्यायची आहे माझ्या देहावर
डोळे मिटलेली प्रमत्त उलटी लपेट...
पिऊन घे...पिऊन घे मला अथपासून इतिपर्यंत...
ठेवू नकोस. एखादीहि पागोळी या तनमनदेहाची खुणेला.
क्लिओ म्हणून कुणी होती
याचा मागमूसहि लागतां कामा नये
माझ्या गर्भावरून वहाणाऱ्या प्रलयवाऱ्याला
अन् शेवटीं...विषवृक्षानें घेतल्यावर कवेंत आकाशपाताळ
जा असाच सळसळत...असाच सळसळत
टाकून माझ्या प्राणांत कांत
अन् बस थंडगार विळखा घालून
माझ्या अँटनीच्या कबरीवर...
रोमच्या रोमांरोमांत भिनायला हवं माझं विष...

२८·४·६४

## म्हणून सांगतों...

पांखराचं गाणं पाहूं शकणारा मी...
सूर्यफुलांचा फाया कोटाला लावून फिरणारा मी...
मलं चिंतिणारे मित्र विनवणी करतात
आणखीं किती कल्पें कुढत रहाणार आहेस तूं या काळोखकोषांत ?
माणसं भलीं...पण ज्यांच्या सांवल्या
सरपटत जातांना पावलोपावलीं होतात होत्या-नव्हत्यांश्या
त्यांना कसं सांगूं समजाऊन या अंधार-अंड्याचं अनद्यतनपण ?
नक्षत्रमंडलांबरोबर हमामा खेळणारा मी...
जाणीव-नेणीवेच्या घाटावर समंध होऊन समाधिस्थ होणारा मी...
ज्यांचे हात दांडीवरील कपड्यांपर्यंतहि पोंचत नाहींत
त्यांना कोणत्या शब्दांनीं सांगूं मी गोष्ट
या काळ्याभोर शिंपल्यांत मिणमिण ठणकणाऱ्या हिरण्यगर्भ थेंबांची ?
गड्यांनो, माझ्यावर विश्वास असूं द्या.
कितीहि झालं तरी अखेर मी तुमच्यांतलाच आहें.
असलों तर थोडा वेगळा...काजळाच्या बोटाएवढा.
मनांत आणलं तर मीहि तुमच्यासारखाच हसूं शकतों
जिवणी किंचित् हलवल्यासारखी करून.
तुम्हांला रडायचं तर डोळ्यांत बोट घालावं लागतं.
मला तर ग्लिसरीन घातल्याशिवाय आंसवाच्या डोहांत
चंद्रबिंब पहातां येतं. तुमच्यासारखाच मीहि
भांडतों-तंडतों, रागवून बसतों, अबोल होतों;
या कृष्णकमळीच्या कमानीखालीं बसलों,
हा काळोखाचा कॅलिडोस्कोप डोळ्याला लावला
कीं पार्थाला कुरुक्षेत्रीं फुटलेले डोळे मला फुटतात

नि सारें पार्थिव-अपार्थिव अब्ज, परार्ध, निखर्व
अंगांनीं उल्लूनफुल्लून निराकार स्वरूपांत माझ्यासमोर उभं रहातं.
कोटि सूर्यमंडलांच्या बागेंत थुईथुई नाचणारा हा अनंत मोर
जो पाहूं शकतो त्याच्याच पाठीवरून
काळोख प्रेमभरानं हात फिरवीत असतो. म्हणून सांगतों, गड्यांनो...

२९.४.६४

## प्रसूतिगृहांत वाट पहाणारा कुणी

न वहाणारा वारा...न वहाणारं ऊन...
थबकलेल्या तबकडीचं न ठिबकणारं घड्याळ...
न हलणारे पाळणे...न हलणाऱ्या चिमण्या...
न ऐकूं येणारीं धूसर अंगाईगीतें...
नुसता तंग संगमरवर उभा थिजलेल्या आसंमतांत...
नुसते डॉक्टर्स...नुसत्या नर्सेस...पांढऱ्या फटफटीत मेणाच्या...
येणाऱ्याचे पाय असेच असतील का पांढरे
संगमरवरांतील हस्तिदंती सांवल्यासारखें ?
कीं पाठवणी करतांना या मातीच्या जगांत
काढलीं असतील त्याच्या पावलांवर
नियतीनें एकदोन तरी मेंदीचीं स्वस्तिकें ?
त्याचे डोळे कसे असतील ? त्याचें जावळ कसें असेल ?
तो गोरा असेल कीं काळा असेल ?
पिवळा असेल कीं तांबडा असेल ?
न वहाणारी दुपार...न वहाणारी संध्याकाळ
थिजलेल्या तावदानाची न उघडणारी खिडकी...
निजलेलं भूत...भाजलेलं वर्तमान...सजलेलं भविष्य...
बाळाच्या मुठींत काय काय असेल ?
शंख असेल ? चक्र असेल ? गदा असेल ? पद्म असेल ?
कीं नुसतीच निळी-तांबडी पेन्सिल असेल ?
हें घुंगुरवाळे त्याचेच वाजतायत् का ?
ही गालावरची खळी बाळाच्याच गालावरची का ?
हा मीच...हा मीच...हा मीच जणूं पुन्हा येतों आहे.
येणाराला विचारा तूं कोण ? तो नक्कीच उत्तर देईल—मी.

मी म्हणजे मी...मी म्हणजे तुम्हीं...मी म्हणजे ते...त्या...तीं.
मी हें एकमेव 'सर्व'नाम आहे.
सारं अस्तित्व कसं मखरांतल्यासारखं सुंदर थिजलं आहे
आपण सर्व पुन्हां जन्माला येत आहोंत.
पहिल्या माणसापासून शेवटच्या माणसापर्यंत
पहिल्या प्राणापासून शेवटल्या प्राणापर्यंत.
थांबा... जरा श्वास रोखून धरा...
येणारा येतो तेव्हां कसं प्रसन्न असावं सगळं देव्हाऱ्यासारखं !
अगदीं थिजून जा. या अस्तित्वासारखेच थिजून जा.
एक सूतसुद्धां इकडे तिकडे होऊं नका.
हसलांत तर येणाऱ्याचा फोटो नीट येणार नाही.
रेडी !...एक...दोन...
पण झालाच घोंटाळा.
येणाऱ्याच्या पाळण्यावरची ती चांदणी हललीच अखेर !

२९·४·६४

## सौदा

तूं माडीवर उभी असतेस;
मी जिना चढत असतों.
तूं मला पाहिलेलं असतंस.
मी तुला पाहिलेलं असतं.
तुझा हिशेब चोख असतो;
माझा व्यवहार रोख असतो.
देवाणघेवाण काय ती
अर्ध्यामुर्ध्या क्षणाची
तुझं मीं देणं नाहीं...माझं तूं देणं नाहींस.
सगळा जमाखर्च कसा
पलंगावरच्या चादरीसारखा...

तूं माडीवर उभी असतेस.
मी जिना उतरत असतों.
तूं आतां वाट पहात असतेस,
माझ्यासारख्याच आणखी कुणाची.
तुला कांहीं वाटत नाहीं
मला कांहीं वाटत नाहीं.
दोन्ही मनं कशीं शुचिर्भूत
तुझ्या केंसांतील गजऱ्यासारखीं...

तूं माडीवर उभी असतेस.
मी घरीं परतत असतों.
नाक्यावरच भेटतात सासू, सासरा, मेहुणे.

"काय साहेब, चांगला माल दाखवूं का?"
सगळे दलाल...सगळे कलाल...
पार्शी स्मशानांतील गिधाडांसारखे...

तूं माडीवर उभी असतेस
तेव्हां तीहि माडीवर उभी असते.
पण हा जिना आपला
चढायचा म्हणून चढतों मी.
तुझा सौदा वेगळा
घांसल्यापुसल्या पाटीसारखा
इथला सौदा वेगळा
कपाळाच्या आंठीसारखा...

१-५-६४

## मुंबईतील वसंत

इथलाहि गुल्मोहर वेळच्यावेळीं फुलतो,
बाजूनंच वहात असतात कोकाकोलाचीं गटारें.
इथल्याहि कॅशियावर घमघमते हळद,
सावलीला येतात फक्त भेळपुरीवाले.
इथलाहि आंब्रा मोहरतो नवऱ्या मुलीसारखा,
लग्नाला येतात आंधळ्या भिकाऱ्यांचेच तांडे.
इथलाहि पिंपळ थुईथुई नाचत असतो
पायाशीं त्याच्या केवळ एक कुजकें अंडें.
इथली सकाळ उठते ती ९-५५ ची वाट पहात
इथली दुपार बसते डब्यांतलें खरकटें खात.
इथें असतें संध्याकाळ, पण नसते दिवेलागणीची वेळ
इथे असते रात्रीची फोरासरोडवर वाजत वरात.
इथला सूर्य पळपुटा...इथला चंद्र हिंपुटा
इथल्या नक्षत्रांना नेहमीं हातभट्टीची दुर्गंधि.
इथें असतात डोळे मिचकावणारे खांचा
इथल्या श्वानां बारमास भादव्याची संधि.

१-५-६४

## विषनृत्य

कृष्ण हिच्याशीं बोलतो—
पण हिचे कान चंद्रगप्प झालेले असतात;
हिच्या पदराखालील मंदिरांत
तेव्हां बांसरी वाजत असते.
कृष्ण तिच्याशीं बोलतो—
पण ती तरी कुठं भानावर असते ?
तिच्या स्तनमंडलांतील स्थंडिलांत
तेव्हां पैंजण धुमसत असतात.
कृष्ण होतो चांदणीसारखा पिठूर राखी
चांफेगौरी कळी काळ्या चंद्रकळीसारखी.
कृष्ण असतो थयथय घुंगुरपिंगा घालीत
अन् ती असते आपल्याच विषनृत्याच्या ग्लानींत.

२३·९·६४

## गारुड-डोळा

एकीकडे असावें नुसतेंच असणें
दुसरीकडे केवळ नितळ नसणें
        अन् मध्यें अंगुळभर व्रतस्थ पोकळी
मी कोण ? मी कोण ?
        दशावताराच्या डोळ्यावरची शकुनपापणी
विचार...इथूनतिथून नुसता विचार...
पण प्रतीकाशीं झाल्याशिवाय जिवमिळवणी
कसा व्हायचा त्याला साक्षात्कार
        नसणें असण्याचा...असणें नसण्याचा ?
एकीकडे असावें खऱ्याखुऱ्याचें असणें
दुसरीकडे फक्त खोट्याचें बुजगावणें
अन् मध्यें एकच गारुडडोळा
        लवणारा त्या पापणीसारखा...
मी कोण ? मी कोण ?
मी त्या पापणीवरचा
नुसता एक प्राक्तनथेंब...

२-१०-६४

## मरतांना उघडे राहिलेले डोळे

एक कवि होता.
तो एक दिवस मेला.
अगदीं गळ्याशपथ.
आतां तो मेला म्हणजे नक्की काय झालं?
नक्की तसं पुष्कळच झालं.
ज्या पाठकोऱ्या कागदांची पाठ
त्यानं जन्मभर धरली होती
ते पतंगासाखे उडत उडत
आभाळाच्या पार निघून गेले.
ज्या गरीबबापड्या शब्दांची कवायत
त्यानं जन्मभर घेतली होती
ते दुडदुडत दुडदुडत
स्मशानाचा पास आणायला गेले.
रस-गंध-रूप वगैरे बायांनीं
त्याला दिंडीदरवाज्याच्या पायरीवर
थंड पाण्याची शेवटची आंघोळ घातली.
कवीला याचं कांहींच सोयरसुतक नव्हतं.
तो आकाशाकडे पोट करून
उपडा पडला होता मातीला समांतर.
मग तो मेला म्हणजे विशेष काय घडलं?
तसं खूपच घडलं.
तो मेला तेव्हां

त्याचे डोळे उघडे राहिले होते.
अन् त्यांच्या बुबुळांच्या कांचेंत
आकाशाची पडछाया पडली होती
अन् त्या पडछायेच्या पदराखालीं
एक चिमणा ढग दूध पीत होता.
अन् सगळीकडे अगदीं निळं निळं झालं होतं.
अन् आणखीहि खूप घडलं.
त्याची कवटी फुटतां फुटतां
रात्र झाली ती याच बुब्बुळांतील आकाशाची
अन् सगळ्यांत शेवटीं
त्यानं एक मुकी उचकी दिली
तेव्हां एक चांदणी सूर्यमंडळ भेदून गेली
ती याच पदराखालच्या चिमणढगाची.
आतां अगदीं सगळीकडे काळं काळं झालं होतं.
अगदीं पांढरंशुभ्र
(लक्समध्यें धुतल्यासारखं)
अन् काळंभोरहि...
कवि मेला होता
खरोखरच मेला होता.
अगदीं गळ्याशप्पथ
खरोखरच मेल्याशिवाय थोडंच
सगळं काळं काळं होतं!

कागद…शब्द…
नाद…छंद…
उपमा…प्रतिमा…
शेवटीं खरं एकच :
मरतांना उघडे राहिलेले कवीचे डोळे.

२६·१·६५

## अटळ

अटळ. हें अटळ काय आहे? सांगतों. ऐका. फार सोपं आहे.

थमूद नि आदनं हुकूमशहाविरुद्ध बंड पुकारलं. थमूदचा पार विध्वंस झाला. सात रात्रीं, आठ दिवस नंगा नाच घालणाऱ्या वादळानं आदला निकालांत काढलं. खजूरीच्या पोकळ बुंध्यासारखीं त्यांचीं प्रेतं पोकळ होऊन पडलीं होतीं. पाहिलींच असाल तीं तुम्हीं. थमूद नि आद...आतां ते जिवंत असे कधींच कुणाला दिसणार नाहींत.

फरोहा अन् त्याच्यापूर्वींचीं माणसं, शिवाय उध्वस्त नगरींत राहणारे लोकहि असेच पापी होते. हुकूमशहाचे हुकूम त्यांनींहि मानले नव्हते. अखेर त्यांचें काय झालें? ते शापित झाले नि मातीला मिळाले.

महापूर आला तेव्हां आम्हीं माणसाला नौकेंत घेतलें नि त्याला वांचविलें. आम्हीं त्याला ताकीद दिली होती. ती त्याच्या कानाला ऐकूं जाईल असा आमचा भरंवसा होता.

शेवटीं एक तुतारी एकदांच वाजेल. पृथ्वीवरची माती आकाशांत विलीन होईल—अन् त्याच दिवशीं ती भयानक घटना घडून येईल.

त्या दिवशीं आकाशाच्या चिंध्या, चिंध्या होऊन जातील अन् हुकूमशहानं दिलेला गणवेष घातलेले देवदूत चहूंकडून खालीं उतरतील. आठ भोई हुकूमशहाची रत्नजडित पालखी घेऊन येतील. त्या दिवशीं तुम्हांला त्याच्या दरबारांत येऊन उभं राहावं लागेल. या दिवशीं तुमचीं सारीं गुपितं विवस्त्र होऊन लोकनृत्य करतील.

तुमच्यापैकीं ज्यांच्या उजव्या हातांत त्याच्या जमाखर्चाची वही दिली जाईल ते आपल्या मित्रांकडे वळून म्हणतील: "घ्या नि वाचा! हा हिशेब द्यावा लागणार हें मला माहीतच होतं." हीं माणसं हुकूमशहाच्या उपवनांत राहावयास जातील. रत्नामाणकांच्या फळांचे घोस त्यांच्या अगदीं हाताशीं असतील.

पण ज्यांच्या डाव्या हातांत वही दिली जाईल ते म्हणतील: "मला ही वही पाहायची नाहीं. हा हिशेब माझ्या ध्यानीं-मनींहि नव्हता. इथं येण्यापूर्वी मरणानं मला अभ्यंगस्नान घातलं आहे; मी आतां शुचिर्भूत आहें."

यावर आम्हीं म्हणू: 'याच्या मुसक्या बांधा नि यमपुरीतील आगींत याला भस्मसात करून टाका. सत्तर योजने लांब एवढा साखळदंड याच्या पायांत बांधा. कारण सर्वसत्ताधारी हुकूम-शहावर याची निष्ठा नव्हती. यापुढें याला कुणी मित्र रहाणार नाहीं नि अन्न म्हणून हा शेण खाईल. हुकूमशहावर निष्ठा नसणाऱ्या लोकांना विष्टा हेंच अन्न.'

अगदीं शपथेवर सांगतों कीं ही गाथा कुणी कवीबिवीनं लिहिलेली नाहीं. ही वाणी आहे एका उदात्तमन दूताच्या मुखां-तून निघणारी. कुणा कुडबुड्यानं वर्तवलेलं हें भविष्य नव्हे. ही आहे देववाणी शहेनशहा हुकूमशहाच्या मुखांतून पडलेली. तीवर श्रद्धा ठेवलीत तरच खैर आहे तुमची.

हुकूमशहाविरुद्ध खोटंनाटं उठविणाऱ्याची अखेर अखेरीस अशी व्हायची आहे. हुकूमशहाची मर्जी फिरली तर प्रत्यक्ष परमेश्वरहि बंडखोराला वांचवूं शकणार नाहीं.

पुण्यात्म्यांसाठीं ही गाथा. तुमच्यांत कांहीं कपाळकरंटे आहेत हें आम्हांला माहीत आहे.

अश्रद्धांनो, तुम्हांला ताकीद देण्यांत आली आहे. हुकूमशाही हेंच एकमेव सत्य हें लक्षांत ठेवा. हुकूमशहा तुमच्या रस्त्यानं जाईल तेव्हां दांत विचकून गॅलरींत उभे रहा. हुकूमशहाच्या बुटाला पालीस करायचं तें आळीपाळीनं आपल्या जिभेनं करा. पाठीच्या कण्याला लोण्याचं मालीशने मानं करा. नाहींतर पाहिलीत का ती कुत्र्याची छत्री अस्तित्वाच्या आरशांत पाहून फिदीफिदी हंसणारी !

२६.१.६५

# मृत्यु : कांहीं कविता

१.

मनूच्या नौकेवर
सगळीं जोडपीं होतीं
नव्हतं फक्त एकच.
मरणा-मरणीचं.
कारण मरणी अशी
मादीच नसते कुणी
मरण एकटं होतं
मादीशिवाय.
तें प्रलयाच्या प्रवाहांत
प्रच्छन्न पोहत होतं
नि नौकेमागून येत होतं
'आ' सुसलेल्या देवमाशासारखं.

१३.४.६४

२.

मी मरणार नाहीं.
        मी नुसता बाहेर जाऊन येणार आहे.
थोडा वेळ थोडं बाहेर जाऊन
        पुन्हा परत येणार आहे.
मग कांहीं दिवस राहीन,
        नि पुन्हा जाऊन परत येईन.
पण एखादा भेटलाच चिरंजीव कुणी
        तर इथंच काढीन म्हणतो तेलाची घाणी !

२३·४·६४

३.

दार नीट लावलंस का ?
        हो, अगदी घट्ट.
या बंद दारातून आपल्याला गुपचुप्
        बाहेर पडायचंय्.
        हो, अगदी गुपचुप्.
तुझ्या हातातील बांगड्यांचा आवाज होतोय्.
        तुझ्या हातातील घड्याळाचाहि.
या क्षणी आपण आहोत, पुढच्या क्षणी...
        आपण नसणार...
हंऽऽऽ
        हूंऽऽऽऽ
घेशील ना गुटकन् ?
        हो, अगदी तुझ्याबरोबर,
की घाबरशील ?
        तूच घाबरशील.
काही त्रास नाही व्हायचा.
        तसं झालं तर बरंच,
जालीम आहे.
        जालीमच हवं.
आता आपण शरीरापलीकडे जाणार.
        हो, अन् वेदनांच्याहि.

न जायते म्रियते वा विपश्चित्...

लक्ष्यात आहे वाटतं अजून इंटरच्या पुस्तकातलं ?

हं, घेऊन टाक पटकन्...

एक...दोन...तीऽऽन...

*(पुढं असं दाखवायचं.*
*तो घाबरतो. अगदी ऐनवेळी.*
*ती पालीच्या शेपटीसारखी तडफडत रहाते.*
*दारावर थाप.*
*तो रंगभूमीवरून पळून जातो.*
*बाहेर पावसाची धुवांधार.*
*थिएटरांत मातीचा दरवळ...]*

१३·४·६४

४.

असे तुम्ही रडत का उभे ?
जन्मभर सुक्या मुक्या डोळ्यांनी रडत राहिलात,
मग आताच अगदी कशाला ते ओले करता ?
खुळ्यांनो, या गंगाजळानं घशाची कोरड थोडी कमी होईल.
पण आत्म्याला कुठं घसा असतो का ?
टाका...सगळ्या खिडक्या अगदी सताड उघड्या टाका.
समोरच्या आकाशातली ती चांदणी पहाचीय् मला.
अरे, जन्माला येणारा प्रत्येक आज ना उद्या मरायचाच आहे.
मी मरतोय् याचा अर्थ मी जन्माला आलो होतो एवढाच.
ती गीताबिता जरा मिटून ठेवायला काय घ्याल ?
धड संस्कृतहि वाचता येत नाही तुम्हा अलीकडच्या पोरांना.
अग, जरा जवळ ये अशी; हा क्षण का लांब उभं राहायचा ?
हं, बस इथं. भांडी घासून हात बघ कसे राठ झालेत.
अरेच्चा, पण आयुष्याची रेषा चांगलीच भरभक्कम आहे की.
एकही फुली नाही की कुठं तुटलेली नाही.
छाऽऽन. म्हणजे पुढील जन्मी तुमची-आमची गाठभेट नाही
म्हणायची.

एकंदरींत वटपौर्णिमा प्रसन्न झाली तर तुला !

१३·४·६४

२.

पिस्तुलाची नळी
कानशिलाला भिडवून
मध्यरात्री त्यानं चाप ओढला.
या निशा सर्वभूतानाम् वगैरे वगैरे.
आवाजानं जाग आली
तेव्हा वाटलं बहुधा
ब्रह्मदेव शिंकला असेल.
असणारा माणूस नसणारा झाला.
स्मशानांत तोंड
कानांना भिडलीं...
कुजबुज...खुजबुज...कुजबुज...
आत्महत्त्या केलेल्या माणसाला
आत्महत्त्या न करणारे एवढे का बुजतात ?
आत्महत्त्या करणारा
आत्महत्त्या करीतच नाही,
तो पिस्तुलाची नळी
कानशिलाला भिडवून
मध्यरात्री फक्त चाप ओढतो.
त्याची शेवटली शिंक
ब्रह्मदेव शिंकतो.

१३.४.६४

६.

माझ्या देशाच्या मातीवर
त्यांच्या बुटांचे उमटत होते कराल व्रण
ते पुसून टाकण्यासाठीं
मी जिवाचं रान केलं.
लाऊडस्पिकरच्या आवाजानं
कान पार भरुन गेले होते;
पिसाटरंगी पोस्टर्स पाहून
डोळे पार फुटून गेले होते.
तरीहि निधड्या छातीनं झुंज देत
एकटयानं मी खिंड रोखून धरली.
माझ्या देशाच्या मातींत वाढलेल्या
आया-बहिणींच्या अब्रूसाठीं
मी जिवाचा कोट केला.
कर्णासारखा लढलों
द्वेषाची पर्वा न करतां.
दुर्योधनासारखे दंड थोपटले
अपकीर्तीच्या डोहाकांठी.
छीः थू झाली तरी
गड हातचा जाऊं दिला नाहीं.
माझं जीवन तुम्हांला दिलं
आज मरण देऊन जात आहे.
हिशेब आतां चुकता झाला.

इतिहासाच्या कमानीखालून
कसला तरी काफिला निघाला आहे.
पिरॅमिडस्च्या देशाची दिशा धरून...
अन् माझं वामन–पाऊल
छातीशीं घट्ट कवटाळून
मुक्त रडते आहे
मुक्तकेशा नियति.
बस्स्...हीच माझी पावती.

१२·४·६४

७.

एकनाथांनीं त्याला सांगितलं :
आज तूं मरणार !
तो लटालटा कांपायला लागला.
तसाच पटापटा घरीं आला.
बायकोला मिठी मारून रडूं लागला.
मुलांबाळांना घट्ट कवटाळून बसला.
शेजाऱ्यांकडे जाऊन गयावया करूं लागला.
घोंगडीवर बसतां बसतां आठवण झाली.
कपाटाची चावी तिला द्यायची राहिली.
एकीकडे शॉयलॉक ओढीत होता;
एकीकडे घोंगडीनं गच्च धरून ठेवला होता.
दारांत केव्हांचा तिष्ठत होता मेणा
पण याच्या आत्म्याला लपवण्याच्या कोण वेणा !
एकनाथ पायरीवर बसले होते.
उगीचच गालांत हंसत होते.

१२.४.६४

८.

एक भला मोठ्ठा ऑफिसर.
जितका मोठ्ठा तितकाच अक्काळविक्काळ... कर्दनकाळ!
कारकुनांचीं धोतरं पिवळीं करणारा हपिसांतल्या कागदासारखीं...
पण त्याच्याहि मनाला डंसलीं होतीं भीतीचीं कोळीष्टकं.
लालपांढरा शिपाई असायचा सांवलीसारखा पाठोपाठ...
असा कर्दनकाळ उभ्या हपिसांत झाला नाहीं.
एक दिवस हपिसांतच त्याचा आवाज फाईल झाला.
बोलतां बोलतां तो पेपरवेटसारखा खालीं आला.
डॉक्टर आले...
पण डॉक्टरांना कुठं प्रेतं तपासतां येतात काय?
कारकुनांनीं हुश्श केलं.
धोतरं स्पेशल वॉशला टाकली.
भटाला चहाची ऑर्डर देतांना ते म्हणाले:
असा कर्दनकाळ झाला नाहीं...खरंच...
करमरकर, कर्दनकाळाच्या मडक्याला लावा हें लेबल : अर्जंट
अन् तिरडीवर डकवा:
फॉर इमिजिएट् ॲक्शन!

१२·४·६४

९.

बाळा, मीच मला ओळखत नाहीं
तिथं माझी ओळख मी काय करून देऊं ?
मी वाऱ्यासारखा झुळुझुळु वहाणारा
पण कधीं कधीं पिकानं तुडुंब भरलेलीं शेतं
मी वारेमाप कांपीत कां सुटतों, हें कसं सांगूं ?
तुझ्या डोळ्यांत माझं बिंब मला दिसतं आहे,
पण चेहरामोहरा नसलेली ही छाया
माझीच आहे, याची ग्वाही मींच कशी देऊं ?
मी अणूंतील अणूंचाहि अणू आहे.
तुझ्या बाळमुठींत माझा असा कोंडमारा नको रे करूं.
माझा पिता परमेश्वर...तूं पिता परमेश्वराचा...
तूं आहेस तोंवर परमेश्वर आहे...तूं आहेस तोंवर मी आहे—
त्या न दिसणाऱ्या किनाऱ्यापलीकडे एक भलामोठा डोंगर आहे.
त्यावर केव्हांतरी प्रवचन करायचं मनांत आहे.
तोंवर नचिकेतो मरणं मः नुप्राक्षीः
असणं...नसणं...एकच जंतु
स्वतःच स्वतःला गिळून घेणारा...
तूं आपला दुसरा एखादा वर माग बरं.

१३.४.६४

१०.

मला त्यानं आईबहिणीवरून
शिव्या दिल्या त्याचा राग नाहीं आला.
सगळींच मर्द माणसं हें करतात.
पण मला तो ज्यू म्हणाला...निगरडा म्हणाला...
तेव्हां मात्र...
त्याच्या रक्ताच्या थारोळ्यांत
मी पाणावलेल्या डोळ्याचा खिस्त पाहिला.

१३.४.६४

११.

गेला...आणखी एक भला माणूस गेला.
पहिल्या तारखेपासून पहिल्या तारखेपर्यंत तो हप्त्याहप्त्यानं जगला.
शेवटच्या तारखेपासून शेवटच्या तारखेपर्यंत तो कलेकलेनं मेला.
पुस्तकें वाचून त्यानें डोळे बिघडवून घेतले नाहींत.
गाणं शिकायला लागून त्यांना शेजाऱ्यांना पिडलं नाहीं.
हपिसांतून तो कधीं दहाच्या आंत परतला नाहीं.
घरीं येतांना इकडे तिकडे वर नजर केली नाहीं.
झुरळांना...ढेंकणांना... सुलांबाळांना कधीं हात लावला नाहीं.
चुकूनसुद्धां कधीं बायकोच्या वाटेला गेला नाहीं.
मेलासुद्धां किती गुपचुप...आळीमिळी गुपूचिळी...
अशी त्याच्या आयुष्याची तपकीर शेवटीं खलास झाली.
पण परवां त्याच्या पिंडाला कावळा कां शिवला नाहीं ?
शिळ्या कांदा-भज्यांवर तर त्याचं मन गेलं नाहीं !

१५.४.६४

१२.

*('डेड बर्ड' : आल्बर्ट पिकहॅम् रायडर)*

मरण बदलतें कूस माणसांच्या जगांतून पक्ष्यांच्या स्मशानांत.
पूर्वी पेंढा भरलेला पक्षी प्रतिक होतं अन्नब्रह्माचं.
पेंढा भरलेल्या पक्ष्याच्या आसपास मरणाचं सांवट पडत नसे.
पूर्वीचा पक्षी दिसे तसा आधुनिक पक्षी दिसत नाहीं.
आधुनिक पक्षी झाला आहे आतां एक व्यक्ति.
आधुनिक पक्ष्याच्या मरणाला असते जरीची किनखाप मानवी
मृत्यूची.
आधुनिक पक्ष्यानं कधीं पाहिलेल्याहि नसतात इसापाच्या नीतिकथा
आधुनिक पक्षी जात नाहीं कृष्णमूर्तीच्या प्रवचनाला.
आधुनिक पक्ष्याच्या घरट्यांत चित्र असतं
विदूषकी चाळे करणाऱ्या खंवचट माकडांचं
पण मरण कूस बदलतं ती पाखरांच्याच स्मशानांत कशासाठीं ?
आधुनिक पक्ष्याचे डोळे असतात मृत्युतत्त्वाचे केलेले.
आधुनिक पक्षी झोंपलेला असतो स्वाभाविक प्रेतासारखा
निद्रा आणि मरण यांच्यामधील लक्ष्मणरेषेवर
काकपदें उमटतात तीं आधुनिक पक्ष्यांची.
आधुनिक पक्षी म्हणजे एक हटयोगी ऋषि.
जिवंत असतो तेव्हां तो एका पायावर झोंप काढतो.
मेल्यानंतर पाठीनं यमाची रांगोळी पुसून टाकतो.
मृत्यु-निद्रेच्या लग्नांत तो मंगलाष्टकें म्हणतो.

फडफडणाऱ्या पंखांचं चौदा चौकडी राज्य म्हणजे आकाश.
पण गोठलेला पक्षी अखेर येतो तो जमिनीवरच्या मातींतच
आधुनिक पक्षी म्हणजे निर्विकल्प निवृत्ति.
सरपटणाऱ्या मुंग्यांचा...विहरणाऱ्या आत्म्याचा
अंत अखेरीस एकच असतो.
आधुनिक पक्ष्याची पाठ भरलेली असते खंदक-मातीनं.
आधुनिक पक्ष्याच्या पायावर उभं असतं आकाश कसरत करीत.
आधुनिक पक्ष्याच्या वासलेल्या चोंचींत दाणा असतो नक्षत्राचा.
आधुनिक पक्ष्याच्या प्रेतापुढें मरण होतं अनामिक...

१५·४·६४

१३.

अखेरची घरघर लागलेल्या यूडामिडासनं
मृत्यूच्या गळ्याभोंवतीं फांस टाकला आहे स्नेहरज्जूचा.
भंवतालीं बायको...मुलगी...मित्रांचा गोतवळा.
सगळेच जिवाला जीव देणारे घालून बसले आहेत जगण्याचा
मोरावळा.

आतां बाजी आहे यूडामिडासची...
प्रेमाचा उंट हलवून तो मृत्यूला मारूं पहात आहे तिरपी बगल.
कांहींहि करून त्याला हा डाव जिंकायलाच हवा.
यूडामिडासला पिरॅमिडसारखं अमर व्हायचं आहे.
इडापिडा टळो नि यूडामिडास असाच तडफडत राहो.
यूडामिडास...एक वेडा...एक पागल...
न मरूं पहाणारा एक मरणोन्मुख माणूस...
सामान्य माणूस...त्याचं हें रोजचंच मरण.
जगाचा बेमालूम निरोप घ्यायची अलीकडली एक फॅशन
कॅलेंडरवरचा यूडामिडासहि झुरळांनीं कुरतडून टाकला आहे.
मरणाऱ्या माणसाच्या अत्यवस्थ खोलींत
ठळक दिसतात ते जिवंत ते माणसांचेच पुतळे...
सामान्य माणसांची मृत्यूशय्याहि धड चित्रांत दिसत नाहीं.
तिच्यावर तडफडणारं प्रेत तरी असावं, पण तेंहि नाहीं.
हलल्यासारखे वाटतात ते नुसते जिवंत मुखवट्यांचे ओठ
स्मशानांत हॅम्लेट बसलाय म्हणावं तर तसंहि नाहीं.
ही खोली पछाडलेली आहे कसल्यातरी अनाम, जड भीतीनं.

आपल्याहि शरीराचा असाच घांस होणार का ?
आपल्याहि भावनांचं असंच लांकूड होणार का ?
अन् पुढं काय होणार ? पुढं काय होणार ?
मुखवट्यांच्या नसानसांतून जातं
मृत्युशय्येवरील प्रेत थंडगार सळसळत
अन् हजार डोळ्यांना दिसते हजार दिशांत
एक अक्राळविक्राळ सांवली
सगळीं प्रेतें पदराखालीं घेणारी...

१५·४·६४

१४.

काल त्याला ॲडमिट केलं,
आज पहाटें तो मेला.
एवढीं लांकडं त्याच्या अंगावर ठेवलीं,
पण त्यानं हूं कीं चूं केलं नाहीं.
मरणारीं मरून जातात,
जगणारीं मात्र मात्रेमात्रेला मरत रहातात.
आज पहाटें मेलं तें कोण ?
तो...मी...कीं आपण सगळेच ?
'मॉर्च्युअरी'च्या पाटीवर
तीं गिधाडं कशाला येऊन बसलीं आहेत ?
कुणाच्या खाटेभंवतीं कधीं
कफनगोषा घातलेलीं पार्टिशनं
येऊन उभीं रहातील
याचा भरंवसा कसा देतां येईल ?
मरणारीं मरून जातात
जगणारीं मात्र यात्रेयात्रेंतच आटपत असतात.

१२·४·६४

१५.

नाहीं रे नाहीं,
मला वेदना होताहेत
त्या या शरिराच्या नाहींत.
ठणका लागलाय् सारखा माझ्या आत्म्याला.
काय घाण मागें ठेवून जातोंय् मी ही !
जन्म गेला सगळा सोंगंढोंगं करण्यांत
आतां तरी काढा रे कुणी हा कातडीवरचा मुखवटा.
प्रकाशाचं घड्याळ रितं होतं चाललंय्.
आतां टिक्‌टिक् ऐकायची ती नुसत्या काळोखाची.
त्या मांजराला दूध नाहीं का रे घातलंत ?
अन् तो टॉमी कशाला भुंकतोय् मघांपास्नं ?
संभाळ...संभाळ...पायाखालीं चिरडशील तो ढेंकूण...
मुंग्यांसाठीं साखरेचं कार्ड काढायचं आहे...विसरूं नका...
घटिका भरत होती तसतस् या ओल्याचिंब चौकोनांत...
अन् आतां पाऊल उंबऱ्यावर असतांना
कोण लावतंय् हे सूर्य-चंद्र दाराला ?
नुसता प्रकाश...नुसता अंधार...
वितीच्या प्रवासांत चुकलेली मुसळधार...
आत्म्याला कसं मोकळं मोकळं वाटतंय् !
टाका...टाका...सगळे मुखवटे त्या मळखाऊ माळ्यावर !
या प्रेताला आंतां नागडं होऊं द्या.

१२.४.६४

७४३४३ वि: चरित्र
९८८८ २२/३/७१
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
74830

१६.

माणूस कधीं मरतो ?
माणूस डोळे मिटतो तेव्हां मरतो.
तो डोळे कां मिटतो ?
त्याच्या डोळ्यांत वाळू जाते म्हणून.
त्याच्या डोळ्यांत वाळू कां जाते ?
तो समुद्रांत बुडतो म्हणून.
तो समुद्रांत कां बुडतो ?
त्याच्या होडींत पाणी शिरतं म्हणून.
त्याच्या होडींत पाणी कां शिरतं ?
त्याच्या होडीला भोंक पडतं म्हणून.
त्याच्या होडीला भोंक कां पडतं ?
होडीचं लांकूड कुजलेलं असतं म्हणून.
होडीचं लांकूड कां कुजतं ?
ती वयस्क झालेली असते म्हणून.
ती वयस्क कां होते ?
तिच्याकडे कुणीसुद्धां पहात नाहीं म्हणून.
तिच्याकडे कुणीसुद्धां कां पहात नाहीं ?
तिच्यांत कांहीं अर्थ उरलेला नसतो म्हणून.
तिच्यांत कांहींच अर्थ कां उरत नाहीं ?
तिचा सारंग मेलेला असतो म्हणून.
तिचा सारंग कां मरतो ?
त्यानं डोळे मिटलेले असतात म्हणून.

तो डोळे कां मिटतो ?
त्याच्या डोळ्यांत वाळू जाते म्हणून.
त्याच्या डोळ्यांत वाळू कां जाते ?
हें सगळं असंच चालायचं असतं म्हणून.
असंच म्हणजे कसं ?
असंच म्हणजे असंच...असंच...
वाळू...डोळे...

१२·४·६४

१७.

मृत्यु म्हणजे एक नंबरचा मवाली.
तो कसा ?
तो गळ्याला रुमाल बांधून शिट्या घालीत फिरत असतो.
आणखी ?
त्याच्या हातांत रामपुरी चाकू असतो.
असं ?
तो तुम्हांला भोंसकून पटकन पुढें निघून जातो.
तो कसा दिसतो ?
त्याचा चेहरा म्हणजे नुसती एक कवटी असते.
नुसती कवटी ?
अन् त्याच्या डोळ्यांना बुबुळं नसतात.
तुला कसं माहीत ?
मी पाहिलंय् त्याला.
कुठं ?
विहिरीच्या बुडाशीं.
तुला कसं कळलं ?
मी ओळखतें त्याला.
कसं काय ?
मला त्याची भीति वाटते.

१२·४·६४

१८.

अथेन्समध्यें असतांना
मी अधांतरींच चालत होतों.
कितीतरी मेलेलीं माणसं
मला तिथं भेटलीं.
एके ठिकाणीं पाटी होती :
डाण्टेज् इन्फर्नो.
तसाच पुढें गेलों.
प्लेटो, ॲरिस्टॉटलनीं
करंदीकरांचं कुशल विचारलं.
डेमोस्थिनसनं तोंडांत ठेवायला
गारांच्या गोट्या दिल्या.
म्हणाला. सराव केलास तर
सूर्यावरच्या माणसाशीं तुला बोलतां येईल.
झांथेपीनं कडाकडा बोटं मोडलीं.
फडाफडा कुणालातरी शिव्या घातल्या.
ॲरिस्टोफेनिसनं खिशांतून बेडूक काढला.
नि एका भित्र्या ढगावर अलगद ठेवून दिला.
भेटला नाहीं फक्त सॉक्रेटीस.
ऐकलं : अलीकडे हॅमलॉक पिऊन
तर्र असतो चव्वीस तास.
तरीच डाण्टेच्या इन्फर्नोवर
त्यानं घाण घाण लिहून ठेवलं होतं !

१२·४·६४

१९.

माणसांची मृत्यूची शर्यत लागते.
बघतां बघतां माणसाला मागें टाकून
मृत्यु क्षितिजापलीकडे जाऊन बसतो.
माणसाला वाटतं आपल्याला हें झेपायचं नाहीं
पण हार घ्यायची त्याची तयारी नसते.
तो आतां डोक्यानें पळूं लागतो
अन् हां हां म्हणतां पेंगणाऱ्या विष्णुला डावं घालतो
माणूस शर्यत जिंकतो;
पण एक प्रचंड कोरीकरीत भिंत
त्याच्या पुढ्यांत आतां उभी असते...
सारा काळ कुणीतरी
तिच्या पोटांत चिचूण मारलेला असतो.
संसार अपार आहे ?
मग कोट्यावधि आकाशांतून डोकं वर काढणारी ही फडा कसली ?
काळ गांडुळ होऊन वळवळूं लागतो
नि दोन तोंडांचीं आकाशवाणी होते
भल्या माणसा, जा घरीं
नि वावर जरासा मुला-बाळांत
हें अनादि...अनंत...
सारं थोतांड आहे...

१२·४·६४

२०.

*"Question it, Horatio"*

हे देवांनो, जें कांहीं अशुभ असेल तें सर्व आमच्या कानांवर पडूं द्या.
खेटरांनीं पूजा करण्याच्या लायकीचे तुम्हीं,
जें कांहीं भयानक असेल तें सर्व आमच्या डोळ्यांना दिसूं द्या.
तुम्हीं दिलेला सारा दळभद्रीपणा आमच्या प्रार्थनेंतून समूर्त होऊं द्या.
मनाला लूत लागली आहे आमच्या. स्वस्ति.
रक्तक्षय जडलेल्या इंद्राचा आमच्यावर वरदहस्त असो.
मेनिंजायटिस झालेल्या पूषाची आमच्यावर मेहरनजर असो.
निर्मनुष्य रस्त्यावरून चालत रहाणाऱ्या तार्क्ष्याची कृपा असो.
न चालणारें ग्रंथालय घालून बसलेल्या बृहस्पतीचें लक्ष असो.

*भारद्वाजाचा पुत्र सुकेशा, सत्यकामाचा थोरला लेक शिबि, सूर्याचा नातू गार्ग्य, अश्वलचें शेंडेंफळ कौसल्य, नागपूरहून बिनतिकिटानं आलेला भार्गव अन् कात्यायनाचा प्रिन्स ऑफ् वेल्स कबन्धी, ही सगळी ब्रह्मपरा ब्रह्मनिष्ठा आणि मंडळी एकदां परम ब्रह्माच्या शोधांत निघालीं. ब्लॅक मार्केटच्या दारांतच त्यांना भगवान् पिप्पलाद भेटले. कुजकीं अंडीं नि नासके टोमॅटो यांच्याबरोबर आणलेल्या टोपल्या सर्वांनीं भगवानांच्या पायावर ओतल्या नि दांत विचकून त्यांनीं याचना केली : "भगवानांनीं आमच्यासाठीं परमब्रह्माचं क्रॉसवर्ड सोडवून दाखवावं."*

सुतारफेणीसारखी आपली खड्डूदार दाढी जरा खाजवल्यासारखं करून नि शालीचा पदर डाव्या खांद्यावर भिरकावून भगवान् क्षणभर खांकरते झाले नि म्हणाले :

"एक वर्ष लंगोट अगदीं करकचून बांधा.
फ्रिज नदीच्या पाण्यानं पहाटे तीन वाजतां अभ्यंगस्नान करा.
ढेंकणांनीं भरलेली गादी फूटपाथवर आणून तीवर उताणे झोंपा,
अन् इतकंहि करून परब्रह्माचं क्रॉसवर्ड सुटलं नाहीं
तरच या माझ्याकडे प्रश्न विचारायला.
प्रश्न विचारणाऱ्याला उत्तर माहीतच असायला हवं.
ब्रह्म, ब्रह्म म्हणतात तें सारें तुमच्याच ठायीं आहे.
तुम्हीच या क्रॉसवर्डचे पैसे भरणार आहांत
नि तुम्हीच तें जिंकले तर जिंकणार आहांत.
पण आज एवढे आलांत आहांत तर एकेक प्रश्न विचारा.
जमेल तेवढी टीप मी आनंदानं देईन.
यावर कबन्धीनं प्रश्न केला :
भगवन्, प्राणीसृष्टि म्हणजे काय व ती कोण निर्माण करतो ?
भगवान् म्हणाले :
प्रजापतीला रेताची बाटली चोरबाजारांत मिळाली.
ती त्यानं घरी आणली नि अदिमायेच्या स्वाधीन केली.
त्या द्रव्यांतील एकेक थेंब कांचेच्या नळींत घालून
तिनं जीवन आणि दारिद्र्य हीं नवरा-बायको तयार केली.
याच जोडप्याला पुढें खंडीभर मुलें झालीं.
प्राणिसंग्रहालय म्हणतात तें हेंच...जगांतील पहिलं
प्रजापति अन् आदिमाया हे आपणां सर्वांचे पहिले आईबाप.

त्यांच्या आधीं चोरबाजार होता, पण तो स्वयंभू होता.
अश्रद्धा हा सूर्य. तळ नसलेलीं भांडीं हा चंद्र.
तळ नसलेलीं भांडीं म्हणजेच सर्व कांहीं.
मूर्त...अमूर्त सर्व कांहीं.
म्हणूनच मूर्त सारखा घोष करीत असतं :
ॐ भवति भिक्षां देहि...
तुम्हींहि या मंत्राचा जप करीत जा म्हणजे तुमचं कल्याण होईल.
आतां सूर्याविषयीं थोडें सांगतों.
सूर्य दांत घांसायला पूर्वेकडे जातो.
इतर दिशांत तो इतर विधी उरकून घेतो.
पश्चिमेच्या संडासांत तो
सारें चराचर गळ्याला नख लावून फेकून देतो.
घासलेट संपलेल्या डबड्यासारखा तो प्रकाशत रहातो.
प्रकाशत रहाण्याखेरीज त्याला दुसरें कामच नसतें.
सूर्य स्मशानरूप असतो; मरणोऽग्नि असतो.
कवितेंत सांगायचं म्हणजे—
रक्षारूपं अरिणं जात-अवेदसं
परायणं ज्योतिशून्यं तपन्तम्।
शून्यरश्मिः शतधा वर्तमानः
प्राणः प्रजानामुदयत्येष सूर्यः॥

प्रजापति म्हणजे तारखेचं कॅलेंडर
त्याला दोन पानें असतात. उत्तरेकडचं नि दक्षिणेकडचं.
जे देशभक्त सोईस्करपणें पोलीसांच्या गोळीला पडतात

नि जे प्राप्तिकराधिकाऱ्याला टांग मारून धर्मशाळा वगैरे काढतात
त्यांना फक्त चंद्रलोकाचीच प्राप्ति होते.
रिटर्न तिकिटाच्या सौजन्यानं ते तिथं अर्थातच परत येतात
नि स्टेशनावरील घड्याळाचे कांटे होऊन बसतात;
म्हणून जे ऋषि प्रजाकाम असतात
ते दक्षिणेच्याच पानाचा कासोटा धरून बसतात.

जे उत्तरेकडल्या गाडीला लोंबकळत जातात
नि भालूची मुळी खाऊन उदरनिर्वाह करतात
ते शेवटीं सूर्यलोकाच्या टर्मिनसपर्यंत तरी जाऊन पोचतात.
सूर्यलोक म्हणजे बोलत्याचालत्या प्रेतांचं माहेरघर.
तें अमर आहे; अभय आहे. तेंच ध्येय आहे.
या स्टेशनाचं परतीचं तिकीट मिळत नाहीं.
एकदां गेला म्हणजे गेला; पार जाऊन पोंचला.
ज्ञानी माणसाला इथला तिकीट चेकर पकडून ठेवतो.

प्रजापति म्हणजे मासिक पाळी.
या पाळीच्या कृष्णपक्षांत साऱ्यां बुधल्यांचे तळ निघतात.
शुक्लपक्षांत ढेंकणासारखं तांबूस पाणी गटारांतून वहात असतं.
म्हणूनच जुने आणि जाणीते ऋषि
इष्ट ते कृष्णपक्षांतच उरकून घेतात.
कृष्णपक्षांत विजेचे दिवे जात असल्यामुळें
या ऋषींच्या भानगडी प्रकाशांत येत नाहींत.
प्रकाशांत न येणें हें या प्रकारें सोईचें असते.

प्रजापतीचा हुकूम जे तंतोतंतपणें पाळतात
त्यांना खंडीभर मुलांबाळांची प्राप्ति होते.
(या प्राप्तीवर कर भरावा लागत नाहीं.)
ब्रह्मलोकींचीं प्रसूतिगृहं यांच्यासाठींच खास राखून ठेवण्यांत येतात;
कारण यांच्या कमरेला घट्ट धोतरांच्या वळ्या पडलेल्या असतात.
काळ आणीचा असो कीं बाणीचा असो
यांचा कारखाना अहोरात्र चालूंच असतो.
सत्यानं यांच्या मांड्यांत पाचर मारून ठेवलेली असते.

ज्यांच्या मनांना रुंदी नसते
नि ज्यांचीं अंतःकरणं नया पैशासारखी चपट असतात
जे आपल्या तोंडाला लाचारीचं व्हॅनिशिंग क्रीम लावतात
अन् ज्यांच्या बोटावर पंख फुटलेली थुंकी असते
त्यांनाच ब्रह्मलोकींची ही धारावी प्रसन्न होते.
मग एखाद्या न कर्त्यांच्या वारीं
गटारगंगेच्या तीरीं
सट्टयानारायणाची महापूजा साजरी केली जाते
वास येणाऱ्या तोंडानं भटजी नौटाकभर मंत्र म्हणतो
नि अफूची गोळी मारून पडलेला परमेश्वर
गुरुदत्ताच्या किंवा मॅरिलीन मनरोच्या बाटलींतील
गोळ्या शोधूं लागतो.
संगीत खुर्चीतील शेवटल्या खुर्चीवर
दोन शिंगांचा माणूस
हार्मोनिका वाजवीत असतो.

मग भार्गवानं पृच्छा केली :
भगवन्, किती देव या विश्वाशीं व्यभिचार करतात ?
किती देव काळोखाचा पाऊस पाडीत रहातात ?
कः पुनरेषां वरिष्ठ :—इति ॥

भगवान् पिप्पलादक उत्तर देते झाले :
असे देव असतात एकूण नऊ
हे सगळे कॅबिनेट दर्जाचेच असतात
अंधाराच्या बादलींत विश्व भिजत ठेवतांना ते म्हणतात :
आम्हींच केवळ या बाणाच्या टोंकावर
चौऱ्याऐशींचा तमाशा करूं शकतों

पण यांच्यापेक्षांहि श्रेष्ठ असा एक देव असतो.
त्याचं खरं नांव कुणालाच माहीत नाहीं;
पण सोईखातर आपण त्याला यमदेव म्हणूं
तो म्हणतो: यॅर्हे, म्हणे आम्हीच या बाणाच्या टोंकावर...
उचलली जीभ लावली टाळ्याला.
मीच एकटा आत्म्याची घडी करून
या बाणाच्या टोंकावर कामसूत्र म्हणूं शकतों

देव आपले कान खुंटीला टांगून ठेवतात.
संतापून जाऊन यमदेव वॉक् औट करतात.
देवांचा जीव भांडयांत पडतो
यमदेव स्थिरावल्यावर शेषाची फडाहि स्थिरावते.

मधमाश्यांची राणी निघून जाते.
तेव्हां मधाचीं पोळीं रिकामीं पडतात नाक्षत्रीय अवकाशासारखीं.
राणी कालांतरानं पुन्हां गादीवर येते
नि मधाचा राजवाडा पोरांच्या फलटणींनीं गजबजून जातो.
शब्द...मन...दिसणारं...ऐकूं येणारं...
पुन्हां इहलोकीं वसतीला येतं.
त्वचेला डोळे फुटतात,
डोळ्यांना कान फुटतात,
कानांना नाक फुटतं,
अन् नाकाला जीभ फुटते.
मायाबाजार क्षणांत खरा क्षणांत खोटा
व्याधाच्या चांदणीसारखे हातोहात रंग बदलणारा
हा खोटा कीं हा खरा कीं हा खराखोटा कीं हा खोटाखरा?
कुठल्यातरी वैराणांत प्रश्नाचा अणुस्फोट होतो.
हिरोशिमा-नागासाकीच्या दिशेनं
मंत्रपुष्पांसारखा देवांचा आवाज येतो :
एषोऽग्निस्तपत्येष सूर्य
एष पर्ज्यन्योमघवानेष वायुः।
एष पृथिवी रयिर्देवः
सदसच्चामृतं च यत् ॥
(वा, काय खर्ज लागलाय!)

रथचक्राच्या नाभींत जशा अरा स्थिरावलेल्या असतात,
तसं मरणाच्या फिरत्या पाळण्यांत चराचर घट्ट बसविण्यांत
आलेलं असतं.
यमाच्याच ध्रुवताऱ्याचा मागोवा घेत सारीं वर्तुळं गरगर
फिरत असतात.
आपलीं मरणं आपण अशा प्रकारें पुन्हां पुन्हां मरत असतों.
हे मृत्यो, तुला आमचा कोपरापासून नमस्कार !
तूं आहेस म्हणून माणसाच्या मेंदूला प्रश्नांचा ट्यूमर तरी झाला आहे.
तूं आहेस म्हणून देव कांचेच्या कपाटांत तरी आहेत.
तूं आहेस म्हणून आम्हांला श्राद्धांचीं जेवणं तरी चापायला
मिळतात.
तूं आहेस म्हणून कावळ्यांना रेशनकार्डाविना तांदूळ मिळतो.
तूं आहेस म्हणून लेखक-कवि आहेत.
तूं आहेस म्हणून मरणोत्तर कीर्ति आहे.
तूंच जीवनसत्य आम्हां प्रेतवत् बोलक्या जनावरांचं
तूंच परमहंस आंधळ्या अथर्वाङ्गिरसांचा.
हे मृत्यो ! तू आईक्मनहूनहि महापराक्रमी आहेस.
तूंच आमचा रुद्र नि तूच आमचें भद्र-अभद्र
खंदकांतील चिखलांत तूंच फुरशासारखा फुसफुसत असतोस.
तूंच आमचा काळाकभिन्न सूर्य
तूंच अमावास्येच्या पोटांत आकार धरणारें वीर्य
(एकूण : हे मृत्यो, तूं प्रेटच !)
जेव्हां ध्रुवबाळाच्या मांडीवर अणुस्फोट होतो
तेव्हां सारें अस्तित्व आनंदसागरांत बुडून जातें.

जें होतें, जें आहे, तें होणार आहे तें सारें कैवल्यरूप बनतें.
एक भलीमोठी पंगत बसलेली असते
(मंडळी...लागतील तेवढीं माणसं मागून घ्या...लाजूं नका.)
नि तींत तूं भसाड्या आवाजांत भेसूर श्लोक म्हणत असतोस.
हे मृत्यो, तूं विदग्ध आहेस, एकर्षी आहेस.
तूं बकासुराचा खापरपणजा आहेस
तूंच खरा आदिमायेचा सत्पति आहेस.
आम्ही तुझं केळीचं पान...चटणी कोशिंबीर...
सर्पाच्या कातेसारखी मलूल रांगोळी...
तूंच आमचं हवापाणी...तूंच आमची वेधशाळा
हे माये! आई मुलाला पदराखालीं घेते
तसं तूं आम्हांला कफनाखालीं घे
आम्हांला असमृद्धि दे—असमाधान दे...अज्ञान दे.

यानंतर अश्वलपुत्र कौसल्यनें पृच्छा केली :
भगवन्, मरणाचा जन्म तरी कसा झाला?
हाडामांसाच्या मखरांत त्याची कोणत्या मुहूर्तावर प्रतिष्ठापना झाली?
मृत्युतत्त्व स्थिरावतें कसें? तें नाहींसें कसें होतें?
बाह्यसृष्टीला त्याचा आधार कसा मिळतो? आत्म्याशीं त्याचें
नातें कोणतें?

भगवान बोलते झाले :
तुझा हा प्रश्न म्हणजे विप्रश्न आहे. अतिप्रश्न आहे.
कारण मृत्यूच्याच बागेंत तुझें बी खोल पुरण्यांत आलें आहे.

मरण म्हणजे आत्मतत्त्वाच्या मातींतून उगवणारा सनातन वटवृक्ष.
मरण म्हणजे साऱ्या अस्तित्वाची न पडणारी सांवली.
मनाच्या मेण्यांत बसून तें या हाडामांसाच्या लेण्यांत येतें.
जसे राजा आपल्या सरदारांना निरनिराळे परगणे वांटून देतो.
तशीं मृत्यु आपल्या दूतांना निरनिराळी कामें लावून देतों.
ज्याला मरणाची ओळख पटली तो अमर झाला.
विज्ञायामृतमश्नुते—इति ॥

यानंतर पाळी आली सौर्यायणी गार्ग्याची :
भगवन्, या देहाच्या शयनमहालांत निजणारे कोण असतात ?
आत्म्याच्या आरसेमहालांत इन्सोम्नीया होऊन कोण बसलेलं असतं ?
स्वप्न पहात बसलेला हा देव कोण असतो ?
कुणाच्या मालकीची असते ही आदि–अंत नसलेली वेदना ?
पिप्पलादांनीं आपल्या शालीवर चढणारा ढेकूण
तिथल्या तिथं चिरडला नि त्याचा वास घेत ते म्हणाले :
हे सौर्यायणी, सूर्याचे किरण जसे त्याच्या तबकडींत सामावलेले असतात
अन् प्रतिदिनीं तो उगवल्यावर ते जसे
त्या बिंबांगांतून निघून अवकाश धवळीत पृथ्वीवर येतात
तसंच या अस्तित्वातीत परमपुरुषाचं असतं.
हा परमपुरुष म्हणजेच मृत्यु.

जिवाभावाच्या भावलीवर जेव्हां त्याची सावली पडते
तेव्हां माणसाला आपल्या त्वचेचं कांहीं भानहि रहात नाहीं.
त्रिशंकूची नक्कल करीत तो
असण्या–नसण्याच्या भरीव पोकळींत अर्थगर्भपणें रहातो.
मातींत वळवळणारे लोक त्याच्याकडे बोट दाखवून
म्हणतातः झोंपलेला माणूस !
(सर्कशींतला पोपट म्हणतो : वासांसी जीर्णानि यथा विहाय इ०)

या अशा अंधारांकित अवस्थेंत
आत्म्याच्या चष्म्याची दोरी कचकन् तुटते.
नि त्याचीं सारीं स्वप्नं त्याच्याशीं घटस्फोट घेतात.
बेंबी आणि ढग यांच्यामधली नाळ तुटली
म्हणजे इंद्रधनुष्याची पडछाया पाताळगंगेच्या पाण्यांत पडते
नि आत्म्याच्या फ्लोरा फौंटनवर
कैवल्यानंदाचें कारंजें आकाश फोडून वाहूं लागतें.
पांखरं झाडांवर स्थिरावतात
तसे आत्मे या आदिदेवाच्या खांद्यावर पंख दुमडून बसतात.
या पुरुषोत्तमाच्या नांवाच्या मागें
द्रष्टा, स्प्रष्टा, श्रोता, घ्राता, रसयिता, मन्ता,
बोद्धा, कर्ता, विज्ञानात्मा इ. इ. असंख्य पदव्या लागलेल्या असतात.
बुरशी चढलेल्या आत्म्याचा सोमरस काढून
तो अहोरात्र 'पहिल्या' धारेच्या तारेंत असतो.
ही देवता 'अच्छा' य आहे, अशरीरिणी आहे
रंगानं ती गंगाजळासारखी आहे अलोहिता

ती १०० टक्के शुद्ध असून तिचा नाश करणारा अजून जन्माला
यायचा आहे.

सदैव हा श्लोक लक्षांत असू द्या :

विज्ञानात्मा सह देवैश्च सर्वैः
प्राणा भूतानि संप्रतिष्ठन्ति यत्र ।
तदक्षरं वेदयते यस्तु सौम्य
स सर्वज्ञः सर्वमेवाविवेश ॥ इति ॥

पाठोपाठ सत्यकामासुत शिबि होताच
त्याच्याहि जिभेला प्रश्नांची खरूज झालेली होती :
भगवन्, जो जयराम श्रीरामाचा मंत्र
जन्मल्यापासून मरेपर्यंत घोकीत रहातो
त्याच्या पदरांत कोणता लोक पडतो ?

भगवान् विशद करते झाले :
बाबारे, जयराम श्रीराम नाहीं
तर माणसाची प्रेतयात्रा नाहीं.
ज्याला प्रेतयात्रा नाहीं
त्याला बारशाचा पाळणा नाहीं
त्याला प्रसूतिगृहाचा वास नाहीं
ज्याला प्रसूतिगृहाचा वास नाहीं
त्याला जगण्या-मरण्याचा ध्यास नाहीं.
जयराम श्रीरामावांचून सारं फुकट आहे

ज्याची प्रेतयात्रा निघत नाहीं तो माणूस कसला !
जयराम श्रीराम म्हणजे ब्रह्मलोकीचे दोन थर
खालचा नि वरचा. जयराम श्रीरामाच्या लिफ्टमधूनच
ब्रह्मलोकीच्या टॉप फ्लोअरवर जातां येतें.
या मंत्राची टेप काढून सकाळसंध्याकाळ वाजवली
तरी हें इथलें स्मशान खिशांत पॉकेट बुकासारखें चपखल बसतें.
यक्षगंधर्वकिन्नरादि त्याचे दास
त्याला काळाबाजार करण्यासाठीं भांडवल पुरवितात
नि छपन्न पिढ्यांचे तीन तेरा वाजवून झाल्यावर
यम घासलेटच्या डब्यावर बसून हिटलरच्या बापासारखें राज्य करतो.

या मंत्राची लॉंग प्लेइंग रेकॉर्ड काढून घेणारास
यक्ष चंद्रलोकीं (प्रत्येक आसन सुशीतलासन) घेऊन जातात.
कांहीं वर्षें कुठंतरी कोळिष्टकासारखं लोंबत राहून
तो वाजतगाजत पुन्हां या स्मशानलोकीं परत येतो
नि पेन्शन किती बसलें असेल
याचा हिशेब करीत बोटाचीं हाडें मोडूं लागतो
(अशा प्रकारें त्याच्या अस्थिपंजरांतील एकूण एक हाडें
वाळू होऊन समुद्राचा तळ गांठतात. असो.)
पण या मंत्राचें दर्शन ज्याला सार्वजनिक
मुत्रीच्या भिंतीवर प्रत्यक्षपणें घडतें
तो हिरण्यगर्भाचे तीन वळसे खाल्ल्यागत
निमिषार्धांत भस्मीभूत होऊन जातो —
म्हणजेच मृत्यु त्याच्या वातड आत्म्याचें बटन करून

-

आपल्या बुश् शर्टाला शिवून टाकतो.

पेस्ट संपलेल्या ट्यूबसारखा तो पापमुक्त होतो
नि आत्मा गळणाऱ्या गर्भासारखा खालीं खालीं खालीं जात असतां
परमिटवाले भटुरगे सोमगायन करीत असतात :
म्हणूनच कुणीतरी म्हणायला हवं :
स एतस्माज्जीवघनात् परात् परं पुरिशयं पुरुषमीक्षते।

रहातां राहिला सुकेशा
शिबीचा प्रश्न संपल्याबरोबर तो म्हणाला :
गुरुदेव ! आतां माझी पाळी.
बोलतां बोलतां त्यानं
दहा पैशांचं एक नाणं आपल्या मनगटावर ठेवलं
नि तो म्हणाला : आचार्य, ही तुमची गुरुदक्षिणा.
गुरुदेवांनीं पृच्छा केली : वत्सा, काय म्हणणं आहे या चवलीचं ?
सुकेशा म्हणाला :
मघांपास्नं आपण मृत्यूविषयीं एवढं बोलत आहोंत
तर हा मृत्यु नेमका असतो तरी कुठं ?
माझ्या प्रश्नाचं नेमकं उत्तर हवंय् मला.
ती तुमची नेहमींची थापेबाजी नकोय्.
तो सर्वव्यापी, सर्वगामी आहे वगैरे वगैरे;
किंवा तो असून नसल्यासारखा व
नसून असल्यासारखा आहे इत्यादि, इत्यादि.

गुरुदेव वदते झाले :
खरं म्हणजे तूंच देऊन टाकलंयस तुझ्या प्रश्नाचं उत्तर.
अक्षरशः तो सर्वव्यापी नि सर्वगामी आहे
असून तो नसल्यासारखा व
नसून तो असल्यासारखा आहे.
क्षणापूर्वी आभाळाला झोंपाळा बांधणारा
क्षणार्धात होत्याचा नव्हता होतो तो कसा ?
ज्याला मृत्युदेव प्रसन्न होतो
त्यालाच ही किमया साधूं शकते.
सुकेशा म्हणाला : हें सगळं ठीक आहे, तरी पण—
गुरुदेव : आलं लक्ष्यांत
तुला त्याचा नेमका पत्ता हवाय्, होय ना ?
मग सुकेशानं आणखी एक नाणं मनगटावर ठेवलं.
गुरुदेव तें उचलायला खालीं वांकले
तेव्हां सुकेशानं त्यांच्या छातीच्या केसांना गुदगुल्या केल्या.
इथं आहे का मृत्यु ?
आहे...इथंहि आहे, तिथंहि आहे, सगळीकडे आहे.
तो विमानांत आहे, बोटीवर आहे, मोटरींत आहे.
९-१७ च्या लोकलमध्यें आहे,
टेबलावर आहे, खुर्चींत आहे,
रस्त्याच्या मधोमध आहे, फुटपाथवर आहे,
इस्पितळांत आहे, दवाखान्यांत आहे, आरोग्यधामांत आहे,
आपण आहोंत तिथंहि तो आहे
नि तुम्हीं जाणार आहांत तिथंहि तो आहे.

जें जें म्हणून आहे त्यावर त्याचं सांवट आहे.
या सांवटाखालींच तृणाचं पातं
आकाशाच्या दिशेनं झेंप घेतं.
या सांवटाखालींच आईचे स्तन लुचणारं पाडस
एकदां चंद्राला तोंड लावतं, एकदां सूर्याचं शोषण करतं...
सुकेशा म्हणाला : ही रेकॉर्ड मजजवळहि आहे.
मला नेमकं उत्तर हवंय्.
(मग त्यानं आणखी एक नाणं मनगटावर ठेवलं.)
गुरुदेव म्हणाले : ऐक तर,
परमेश्वरानं दहा अवतारांना कंत्राट देऊन
हा पृथ्वीचा गोळा बांधून घेतल्यावर
मृत्यु इथं कायमचं रहावयास आला
पण त्याला रहायला चांगली जागाच मिळेना.
तेव्हां आदिमानवाला त्यान
चौऱ्याऐशीं योनींची पगडी दिली
नि एक झक्कपैकीं जागा मिळवली...
(सुकेशा अगदीं हातघाईवर आला होता.
त्यानं आणखी एक नाणं...)
कुठं म्हणून नाहीं विचारलंस ?
ऐक तर—
        माणसाच्या मेंदूंत...

॥ इत्यलं मृत्यूपनिषद् ॥

बॉदेलेअर

अनुवादित कविता

## मरण प्रेमिकांचें

बिछाने असतील, मंद दर्पांनीं ओथंबलेले,
दिवाण, मोठमोठे कोच, खोल, गंभीर थडग्यांसारखे,
अन्, वाढलेले आमच्यासाठीं रम्योदात्त प्रकाशांत,
फुलदाणीच्या वर असतील ओंठगलेले मोहर विचित्र.

आपल्या अखेरच्या ज्वाळेला जपत विझू आलेल्या
दोन विराट् मशालींप्रमाणें आपलीं दोन हृदयं उफाळतील,
अन् आपले दोन जीव त्यांच्या दुहेरी झळाळींत
रापवर्तित करतील दुहेरी प्रकाशबिंबें तेथें मंत्रमुग्धलेलीं.

एके रात्रीं, रात्र गूढ निळी अन् गुलाबी
एक कटाक्ष जाईल, सर्वशक्तिमान्, माझ्याकडून तुझ्याकडे,
एका प्रदीर्घ हुंदक्यासारखा, प्रदीर्घ निरोपानं जडावलेला.

अन् नंतर एक देवदूत उघडील
तें दार अन् आंत येऊन आनंदमनस्क पुनःप्रकाशील
ते कलंकित आरसे अन् रात्रींत विझलेल्या ज्वाळा

(La Mort des Amants)

१४-३-६५

## मरण गरीबाचें

मरण सांत्वनक असतें अन् मरण जीवनदायी असतें;
अंत सगळयाचा, आशा अगदीं एकच तेवढी;
आपण, बेहोष होऊन मरणामृतानं, तोंड देतों संघर्षाला,
धीर घेतो, अन् रहातो चढत सूर्यास्तापर्यंत ती थकलेली चढण.

वादळ, जीवघेणी थंडी अन् हिम यांना व्यापून
मरण आपल्या क्षितिजावर असतें स्पष्टपणें थडथडत;
मरण आपणां सर्वांच्याच परिचयाचें असें विख्यात
वसतिगृह आहे
जिथें आपण विश्रांति घेऊं शकतों, निजूं शकतों अन् वेळ
आनंदांत घालवूं शकतों.

मरण म्हणजे एक देवदूत लोहचुंबकीय हातांचा
जे आणतात स्वप्नें धुंदीचीं अन् पेंगुळलेल्या नीरवतांची
बिछान्यावरील चादर नीट करण्यासाठीं नग्न माणसांच्या
नि गरिबांच्या.

मरण म्हणजे गूढ कोठार परमेश्वराचें;
पैशांची थैली गरिबाची; सनातन पितृभूमि त्याची;
दार उघडणारें देवलोकांत अजून पाय न लागलेल्या

(La Mort des Pauvres)

१४.३.६५

## अखेर दिवसाची

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
स्था. क्र. 18830

दिवसाच्या नितळ अन् भयानक प्रकाशाखाली
जीवन वळवळतें, धांवतें, नाचत असतें कांही कारण नसतां,
उद्धट नि ओतप्रत द्वेषभावनेनें.
—लंगोलग क्षितिजावरती

REFBK-0014830
REFBK-0014830

रात्र बुलंदगहिरी अन् विशाळ
उगवते, माणसाळवीत भूक,
लपवीत सगळ्या गोष्टी, अगदीं लाजसुद्धां,
कवि स्वतःशींच : " अन् अखेर !

माझा प्राण अन् माझा रत्नांकित कणा
भीक मागूं लागले आहेत विश्रांतीची. मी चाललों,
अंधारी स्वप्नें घेऊन माझ्या या हृदयांत,

पाठ जमिनीला लावून पडण्यासाठीं,
गहिऱ्या सावलीच्या हे थंडगार पडद्यांनो,
घ्या गुंडाळून, घ्या सामावून मला तुमच्या काळोखांत."

(La Fin de la Journee)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ...५४३४३... दि: ...२४.२.९५
...१९८८... ...चारोता...
...९९१३१६७१

'गंधर्व' नंतर पाच वर्षांनी प्रसिद्ध होणारा रेग्यांचा हा नवा कवितासंग्रह.
मध्यंतरीच्या काळात ते एक नवे जग बघून आले.
तेथील त्यांचे काही काव्यात्म अनुभव शब्दरूप घेऊन
रसिकांच्या भेटीस येत आहेत.

ज्या उमेदीने रेग्यांनी कथालेखन केले, तीच उमेद त्यांनीं काव्यलेखनातही दाखविली.
दोन्ही प्रांतात ते प्रत्यही नव्या वाटा शोधीत होते...शोधीत रहातीलहि.
अनुभव तेच...प्रत्येक संवेदनाक्षम माणसाला येणारे...
पण रेग्यांच्या लेखनांत ते केवढे वेगळे रूप घेऊन साकार होतात!

चाकोरीत भिरभिरत रहाणे हे रेग्यांच्या स्वभावातच नाही.
पण त्यांच्या या नव्या-नव्याच्या हव्यासाला महत्त्व आहे
ते त्याच्या वेगळेपणासाठींच केवळ नाही.
तर कलात्मक दृष्ट्या ते अपरिहार्य आहे म्हणून.

रेगे नवी जिद्द घेऊन पुढची पाऊलवाट धरायला निघाले आहेत
याची साक्ष त्यांच्या या संग्रहातील कविते-कवितेंत दिसेल.
प्रस्तुत संग्रहातील 'मृत्यू'वरील त्यांच्या कविता
हें तर मराठी कवितेला मिळालेले अक्षर लेणे आहे!